
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २२६
www.ramprahar.com
◆ गुरुवार, ५ मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

१८ लाख ७६ हजारांचे दागिने चोरणाऱ्यांना अटक/२
बाळगंगा प्रकल्पग्रस्तांचे उपोषण स्थगित/५
दिवाळे येथे पारंपरिक वेशभूषेत क्रिकेट स्पर्धा/८

## शहरी गृहनिर्माण संस्थांना एनए करातून दिलासा



**मुंबई :** राज्यातील शहरी भागातील गृहनिर्माण संस्थांवर आकारला जाणारा अकृषिक (एनए) कर रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला असून यापुढे जुन्या किंवा नव्या कोणत्याही बांधकामांवर हा कर आकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे पूर्वीची थकबाकीदेखील शासनाने माफ केली असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि.४) विधानसभेत केली. अर्थसंकल्पीय अधिवेशनातील प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित प्रश्नावर महसूलमंत्री बावनकुळे यांनी हा निर्णय स्पष्ट केला. या नव्या प्रणालीमुळे नागरिकांना वारंवार महसूल कार्यालयात जावे लागणार नाही तसेच करप्रणाली अधिक सुलभ होणार असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले. या निर्णयामुळे गृहनिर्माण संस्थांवरील आर्थिक भार कमी होणार असून शहरी भागातील हजारो फ्लॅटधारकांना दिलासा मिळणार आहे.

### परदेशात अडकलेल्या नागरिकांना परत आणण्यासाठी

# सरकारकडून सर्वतोपरी प्रयत्न

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान परिषदेत माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

इराण विरुद्ध इस्रायल-अमेरिका युद्धामुळे अनेक भारतीय लोक परदेशात विशेषकरून आखाती देशांमध्ये अडकले आहेत. तेथून महाराष्ट्रातील लोकांना परत आणण्याचे प्रयत्न आपण सुरू केले आहेत. या संदर्भातील जबाबदारी गिरीश महाजन यांना दिली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.४) विधान परिषदेत दिली.

मध्यपूर्वेतील संघर्ष झपाट्याने विस्तारत असून इराण-इस्रायल तणावाने संपूर्ण आखाताला वेढा घातला आहे. तेहरान, लेबनॉन, आखाती देश आणि हॉर्मुझ सामुद्रधुनीपर्यंत युद्धाची छाया पसरली आहे. संघर्ष थांबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर हालचाली सुरू असल्या तरी रणांगणावरील कारवाया अधिक तीव्र होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर आखाती देशांतून भारतीय लोकांना केंद्र सरकारच्या समन्वयातून मायदेशी परतत आणण्यासाठी काय प्रयत्न केले जात आहेत याबाबत अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहाला सविस्तरपणे अवगत केले. (पान २ वर..)

### विदेशातील मराठी मंडळेही सक्रिय

*परदेशात जिथे-जिथे आपली मराठी मंडळे आहेत, ती सक्रिय करण्यात आली आहेत. त्यांच्या माध्यमातून आपले जे लोक आहेत, त्यांना मदत करत आहोत. व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून मंत्री गिरीश महाजन त्यांच्याशी बोलले आहेत. आपले चीफ प्रोटोकॉल अधिकारी गावंडे यांना ही जबाबदारी दिली आहे, कारण ते फॉरेन सेवेचे अधिकारी आहेत. दूतावासाची एक बैठक घेण्यात आली आहे. ज्या एसओपी आहेत, त्या नागरिकांना दिल्या आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.*

## हिंदी महासागरात इराणी युद्धनौकेवर हल्ला

### ८० जणांचा मृत्यू; सुमारे शंभर बेपत्ता

**कोलंबो : वृत्तसंस्था**

इराणचा अमेरिका आणि इस्त्रालयविरुद्धचा संघर्ष तीव्र झाला असताना श्रीलंकेजवळ एक भीषण घटना घडली आहे. हिंदी महासागरात इराणी युद्धनौकेवर अमेरिकन पाणबुडीने बुधवारी (दि. ४) दुपारी हल्ला केला. या घटनेत बोटीवरील १८० जणांपैकी ८० ठार झाल्याची माहिती समोर आली आहे. अनेकजण अद्याप बेपत्ता असून जखमींना उपचारासाठी श्रीलंकेतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, असे वृत्त रॉयटर्स या आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थेने प्रसिद्ध केले आहे.

इराणी जहाजावर हल्ला झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर श्रीलंकेचे नौदल मदतीला धावले. श्रीलंकेच्या नौदलाने सांगितले की, आम्ही ७९ लोकांचा वाचवले आणि त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. जहाज बुडाले असून १०१ जण बेपत्ता असल्याचे समजते.

## भारतीय तरुणाचा युद्धात मृत्यू

**मुंबई :** मध्य-पूर्वेतील इराण-इस्रायल युद्धाची झळ आता भारतालाही बसली आहे. या युद्धात भारताच्या २५ वर्षीय दीक्षित सोलंकी याचा ड्रोनने बळी घेतला आहे. ओमानच्या किनारपट्टीवर मस्कतजवळ एका मालवाहू ऑईल टँकरवर झालेल्या ड्रोन हल्ल्यात मुंबईतील कांदिवली परिसरात राहणाऱ्या सोलंकी याचा मृत्यू झाला.

मूळचा दीवचा असलेला २५ वर्षीय दीक्षित सोलंकी व्यवसायानिमित्त मुंबईत स्थायिक झाला होता. तो कांदिवली भागात वास्तव्यास होता. ओमानच्या मस्कत किनारपट्टीपासून ५२ नॉटिकल मैलांवर ऑईल टँकरवर स्फोटकांनी भरलेल्या ड्रोन बोटीने धडक दिली. या भीषण स्फोटात टँकरच्या इंजिन रूमला आग लागली आणि त्यात दीक्षितचा जागीच मृत्यू झाला. महिनाभरापूर्वीच आईच्या निधनानंतर तो गावी आला होता आणि पुन्हा कर्तव्यावर परतला होता, मात्र काळाने त्याच्यावर झडप घातली.

## पनवेल मनपा स्वीकृत नगरसेवकपदांसाठी भाजप महायुतीकडून पाच जणांचे अर्ज दाखल

### युवा नेते परेश ठाकूर, डॉ. अरुणकुमार भगत, गणेश कडू, ॲड. प्रथमेश सोमण, दिनेश खानावकर यांचा समावेश



(अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकपदांसाठी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय महायुतीच्या वतीने पाच उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज बुधवारी (दि.४) दाखल केले. महायुतीकडून भाजप युवा नेते परेश ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, डॉ. अरुणकुमार भगत, दिनेश खानावकर तसेच शिवसेनेचे ॲड. प्रथमेश सोमण यांनी आपले अर्ज महापालिकेचे सचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी नानासाहेब कामठे यांच्याकडे सादर केले.

महायुतीचे उमेदवार अनुभवी व अभ्यासू असून त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करण्याचा दांडगा अनुभव आहे. अर्ज दाखल करताना त्यांच्यासमवेत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, भाजपचे माजी शहराध्यक्ष व माजी नगरसेवक अनिल भगत, नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, शिवसेना नेते रमेश गुडेकर, भाजप शहराध्यक्ष व नगरसेवक सुमित झुंझारराव, युवा नेते संजय जैन यांच्यासह इतर उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या पनवेल महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पुन्हा एकदा भाजप महायुतीने वर्चस्व सिद्ध केले. या निवडणुकीत भाजपने ५५, शिवसेनेने दोन आणि राष्ट्रवादी काँग्रेसने दोन जागांवर विजय मिळवत एकूण ५९ जागांसह महापालिकेत पुन्हा एकदा भाजप महायुतीची भक्कम सत्ता प्रस्थापित केली. त्या अनुषंगाने महापौरपदी नितीन पाटील, तर उपमहापौरपदी प्रमिला पाटील विराजमान झाले.

सार्वत्रिक निवडणुकीत ५९ जागांवर विजय मिळाल्यामुळे सातपैकी पाच स्वीकृत नगरसेवकपदे महायुतीच्या वाट्याला आली आहेत. त्यामध्ये सभागृहाचा अनुभव व अभ्यास असलेले परेश ठाकूर, गणेश कडू, डॉ. अरुणकुमार भगत यांच्यासह ॲड. प्रथमेश सोमण आणि दिनेश खानावकर यांना स्वीकृत नगरसेवकपदाची संधी देण्यात आली आहे. त्यांनी आपले उमेदवारी अर्ज बुधवारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल केले. निर्वाचित ५९ आणि स्वीकृत पाच असे एकूण ६४ संख्याबळ महायुतीचे होणार आहे.

## निवडक

### डिजिटल धमकी देणाऱ्या मास्टरमाईंडला अखेर अटक

**कोलकाता :** गेल्या काही दिवसांपासून देशाच्या विविध भागांत बॉम्बच्या खोट्या धमक्या देणारे ई-मेल पाठवले जात होते. या गंभीर प्रकरणाची दखल घेत अहमदाबाद क्राईम ब्रांच आणि सायबर क्राईम युनिटने मोठी कारवाई करीत मुख्य संशयिताला पश्चिम बंगालमधून अटक केली आहे. सौरभ बिस्वास असे या आरोपीचे नाव असून त्याची कसून चौकशी सुरू आहे.

### जगन्नाथ मंदिराच्या खजिन्याची ४८ वर्षांनी होणार मोजणी



**पुरी (ओडिशा) :** येथील श्री जगन्नाथ मंदिरातील बहुप्रतीक्षित 'रत्नभांडार' (खजिना) मोजणी आणि यादीकरण प्रक्रिया अखेर सुरू होणार आहे. ओडिशा राज्य सरकारने २५ मार्च रोजी दुपारी सव्वाबारा ते पावणेदोन या वेळेत या प्रक्रियेची अधिकृत सुरुवात निश्चित केली आहे. तब्बल ४८ वर्षांनंतर ही मोजणी होत असल्याने देशभरात उत्सुकता आहे. मंदिराचे मुख्य प्रशासक अरविंद पाधी यांनी दिलेल्या माहितीनुसार संपूर्ण मोजणी प्रक्रिया फोटोग्राफी व व्हिडीओग्राफीद्वारे नोंदवली जाईल. रिझर्व्ह बँकेचे दोन वरिष्ठ अधिकारी देखरेख करतील.

## उज्ज्वल भविष्यासाठी मेहनतीशिवाय पर्याय नाही -लोकनेते रामशेठ ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले महाविद्यालयात बुधवारी (दि. ४) वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कोकण विभागाचे माजी सहसंचालक (उच्च शिक्षण) डॉ. संजय जगताप उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूषविले. या वेळी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी मेहनतीशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास संस्थेचे जनरल बॉडीचे सदस्य वाय.टी. देशमुख, महाविद्यालयातील माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर, सदस्य विजय लोखंडे, प्रसाद ढवळे आदी उपस्थित होते.

माणूस कामाने मोठा होतो. जिथे संधी मिळेल तिथे काम करता आले पाहिजे. जो व्यक्ती कोणतेही कार्य मनापासून व त्यागपूर्ण रितीने करतो तो खरा माणूस, असे सांगून लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, 'देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता एक दिवस, देणाऱ्याचे हात घ्यावे' या प्रसिद्ध ओळींप्रमाणे आपण स्वतःला घडवले पाहिजे तसेच विद्यार्थ्यांनी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा ज्योतिबा फुले अशा थोर महापुरुषांचा आदर्श घेऊन वाटचाल करावी.

माजी सहसंचालक डॉ. संजय जगताप यांनी सांगितले की, विज्ञान खूप पुढे गेले आहे, आज आपण या टेक्नोलॉजीच्या युगात आहोत. एआयचे जग आहे. त्यात चांगले आणि वाईट काय आहे हे ओळखून आपण त्याचा वापर मर्यादित व आवश्यक ठिकाणीच केला पाहिजे. भारत २०४७पर्यंत जगातील तिसरी महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहे आणि ते नक्कीच यशस्वी होईल यात शंका नाही.

आपल्या भाषणात पुढे बोलताना डॉ. जगताप यांनी, लोकनेते रामशेठ ठाकूर यांची आदर्शवत जीवनगाथा नक्कीच आपणा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे मत व्यक्त करून विद्यार्थ्यांनी साकारलेल्या भित्तीपत्रिका, रांगोळी, चित्रफितीचे कौतुक केले. (पान २ वर..)

## राज्यसभेसाठी भाजपकडून महाराष्ट्रात 'सोशल इंजिनिअरिंग'

### विनोद तावडे, रामदास आठवलेंसह दोन नव्या चेहऱ्यांना संधी



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीसाठी भाजपने बुधवारी (दि. ४) महाराष्ट्रातील उमेदवारांची घोषणा केली. पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले या बड्या नेत्यांसोबतच भाजपने माया ईवनाते आणि रामराव वडकुते या दोन नव्या चेहऱ्यांना संधी देऊन सामाजिक समीकरणे साधण्याचा प्रयत्न केला आहे.

भाजपने यंदा उमेदवारी देताना राज्यातील महत्त्वाच्या समाजघटकांना प्रतिनिधीत्व दिले आहे. नागपूरच्या माजी महापौर राहिलेल्या माया इवनाते या भाजपचा राज्यातील महत्त्वाचा आदिवासी चेहरा आहेत. त्या अनुसूचित जमाती राष्ट्रीय आयोगाच्या सदस्य होत्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या निकटवर्तीय म्हणून त्यांची ओळख असून त्यांच्या निवडीतून भाजपने विदर्भातील आदिवासी मतांचे समीकरण साधले आहे.

धनगर समाजाचे प्रतिनिधित्व करणारे रामराव वडकुते यांनी अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून दीर्घकाळ काम केले आहे. विधान परिषदेचा अनुभव गाठीशी असलेल्या वडकुते यांच्या रूपाने भाजपने पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील धनगर समाजाला साद घातली आहे.

याशिवाय पक्षाच्या राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका निभावणारे विनोद तावडे यांना अपेक्षेप्रमाणे राज्यसभेवर पाठवण्याचा निर्णय झाला आहे, तर मित्रपक्ष असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रमुख रामदास आठवले यांच्यावर भाजपने पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे.

१० राज्यांमधील राज्यसभेच्या ३७ जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी ५ मार्च ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची मुदत आहे. भाजपने देशभरात उमेदवारी जाहीर करताना संघटनात्मक प्रभाव असलेल्या नेत्यांना प्राधान्य दिल्याचे दिसून येत आहे.

## टी-२० वर्ल्डकपमध्ये आज रंगणार भारत-इंग्लंड उपांत्य लढतीचा थरार



**मुंबई : प्रतिनिधी**

ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात भारतासमोर इंग्लंड संघाचे आव्हान असणार आहे. ही लढत गुरुवारी (दि. ५) मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार असून यामध्ये विजय मिळविणारा संघ फायनलमध्ये दाखल होईल. त्यामुळे या सामन्याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागले आहे.

भारतीय संघाने यंदाच्या हंगामात साखळी फेरीत अपराजित राहून सुपर-८ फेरीत प्रवेश केला, पण दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात संघाला पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर पुन्हा टीम इंडियाने दमदार कमबॅक करत उपांत्य फेरी गाठली आहे. वानखेडेच्या मैदानात इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात धमाकेदार कामगिरी करून टीम इंडिया सलग दुसऱ्यांदा फायनल गाठण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल.

भारत-इंग्लंड दोन्ही संघ सलग तिसऱ्यांदा उपांत्य फेरीत भिडणार आहेत. याआधी दोन्ही संघांनी प्रत्येकी एक सामना जिंकलेला आहे. उभय संघांमध्ये याआधी २०२२मध्ये पहिल्यांदा उपांत्य फेरीतील सामना रंगल्याचे पहायला मिळाले होते. यावेळी भारतीय संघाला पराभवाचा सामना करावा लागला. २०२४ च्या हंगामात हे दोन्ही संघ पुन्हा एकमेकांसमोर आले. तेव्हा मात्र टीम इंडियाने पराभवाची परतफेड केली. कमालीचा योगायोग हा की, उपांत्य फेरीतील विजयानंतर आधी इंग्लंडच्या संघाने आणि मग भारतीय संघाने ट्रॉफीवर नाव कोरले होते. त्यामुळे यंदाच्या हंगामात वानखेडेचे मैदान गाजवेल तोच ट्रॉफी जिंकेल, अशी चर्चा रंगताना दिसत आहे.

दरम्यान, उपांत्य सामन्यापूर्वी भारतीय क्रिकेट संघातील काही क्रिकेटपटूंनी मुंबईतील प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिराला भेट दिली. वानखेडे स्टेडियमवर होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या सामन्यापूर्वी, ईशान किशन, अभिषेक शर्मा आणि अक्षर पटेल यांनी गणपती बाप्पाचे दर्शन घेतले आणि यशासाठी प्रार्थना केली.

## मुंबई-विजयदुर्ग 'रो-रो' मार्गावर तीन नवे थांबे

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई ते विजयदुर्ग या 'रो-रो' सेवेचा विस्तार आता अधिक व्यापक होणार आहे. या मार्गावर आता रायगड जिल्ह्यातील दिघी, रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला हे तीन नवे थांबे देण्याचा निर्णय महाराष्ट्र सागरी महामंडळाने (एमएमबी) घेतला आहे.

या तिन्ही ठिकाणच्या जेट्टींची कामे अंतिम टप्प्यात असून येत्या महिनाभरात ही सेवा प्रवाशांसाठी खुली केली जाणार आहे. यामुळे कोकण किनारपट्टीवरील जलवाहतुकीचे जाळे अधिक मजबूत होणार आहे.

## मध्यपूर्वेतील युद्धसंघर्षामुळे रायगडचे २० नागरिक परदेशात अडकले; प्रशासन सतर्क

**अलिबाग : प्रतिनिधी**

मध्य-पूर्वेतील देशांमध्ये सध्या उद्भवलेल्या अस्थिर आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे रायगड जिल्ह्यातील अनेक नागरिक तिथे अडकल्याची भीती व्यक्त होत आहे. रायगड जिल्हा प्रशासनाच्या नियंत्रण कक्षाला प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीनुसार जिल्ह्यातील एकूण २० नागरिकांची यादी समोर आली आहे. त्यांना मायदेशी परत आणण्यासाठी शासन स्तरावरून हालचाली सुरू झाल्या आहेत.

पोलादपूर तालुक्यातील सवाद गावातील तार्लेकर, टोळकर, पठाण, नेकवारे कुटुंबातील १७ जण नोकरीनिमित्त सौदी अरेबिया आणि कुवेतमध्ये स्थायिक आहेत. त्यांच्याशी प्रशासनाचा संपर्क झाला असून सध्या ते तेथे सुखरूप आहेत, परंतु युदधजन्य परीस्थितीमुळे त्यांनी मायदेशी परत येण्याची इच्छा व्यक्त केली आहे. उरण तालुक्यातील जसखार येथील कविश घरत आणि त्यांच्या पत्नी प्रांजली घरत हे लग्नाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी दुबई येथे गेले असून तेथील हॉटेलमध्ये सुखरूप असल्याची माहिती प्राप्त झाली आहे, तर पाली येथील उत्कर्ष मपारा हा उच्च शिक्षणासाठी दुबईत आहे. तो सुखरूप असून कुटुंबियांच्या संपर्कात आहेत.

अडकलेल्या नागरिकांपैकी बहुतांश लोक नोकरी, रोजगारासाठी तिथे वास्तव्यास आहेत, मात्र सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे तेथून बाहेर पडणे कठीण झाले आहे. जिल्हा प्रशासनाचा नियंत्रण कक्ष संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे. अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनी घाबरून न जाता प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या नागरिकांची माहिती राज्य सरकार आणि परराष्ट्र मंत्रालयाकडे सोपवण्यात येणार असून त्यांना सुखरूप परत आणण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी माहिती देण्यात आली.

# एसटीच्या ‘शिवनेरी’ची झेप आता मुंबई-पुण्याच्या पलीकडे!

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गाची ‘राणी’ म्हणून ओळख मिळवलेल्या एसटीच्या अत्याधुनिक, आरामदायी आणि सुरक्षित ‘शिवनेरी’ बस सेवेची झेप आता राज्यभर घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच मुंबई-पुणे मार्गाच्या पलीकडे महाराष्ट्रातील प्रमुख शहरांदरम्यान शिवनेरी धावणार असल्याची माहिती परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

सन २००२मध्ये सुरू झालेल्या शिवनेरी सेवेने वक्तशीरपणा, उत्कृष्ट आसनव्यवस्था आणि सुरक्षित प्रवास या गुणवैशिष्ट्यांमुळे उच्च मध्यमवर्गीय प्रवाशांचा विश्वास जिंकला. इतर बससेवेपेक्षा तिकीटदर थोडे अधिक असतानाही सातत्याने मिळणाऱ्या उत्तम प्रतिसादामुळे ही सेवा सुरुवातीपासूनच नफ्यात आहे, असे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

राज्यभर विस्तारासाठी २०० नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त व्होल्व्हो बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल होताच, मुंबई-पुणेप्रमाणेच इतर महत्त्वाच्या शहरांदरम्यानही शिवनेरी सेवा सुरू होईल. नवीन २०० बसेसमध्ये ३० शयनयान (स्लिपर) बसेसचा समावेश असेल. सध्या ज्या



मार्गांवर विना-वातानुकूलित शयनयान बससेवा आहे, त्या ठिकाणी ‘स्लिपर शिवनेरी’ सुरू करून प्रवासी सेवेला अधिक उन्नत रूप दिले जाणार आहे. आरामदायी बेड-कोच सुविधा, सुरक्षितता आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे दीर्घ पल्ल्याच्या प्रवासात प्रवाशांना नव्या अनुभवाची हमी मिळणार आहे. ‘शिवनेरी’चा हा विस्तार म्हणजे केवळ बससेवेची वाढ नव्हे, तर महाराष्ट्राच्या प्रगत आणि गतिमान प्रवाससंस्कृतीची नवी दिशा आहे.असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

महिला प्रवाशांना तसेच ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना तिकीटदरात ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील ज्येष्ठांना शिवनेरी प्रवास पूर्णपणे विनामूल्य आहे. त्यामुळे नव्या मार्गांवरही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळेल, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

**प्रस्तावित मार्ग**

*नाशिक-पुणे, नाशिक-छत्रपती संभाजीनगर, नाशिक-जळगाव-धुळे, पुणे-कोल्हापूर, पुणे-सांगली, पुणे-सोलापूर, नागपूर-चंद्रपूर, नागपूर-अमरावती-अकोला अशा प्रमुख शहरांचा समावेश आहे. त्यामुळे राज्याच्या विविध भागांतील प्रवाशांना आलिशान, सुरक्षित आणि विश्वासार्ह प्रवासाचा पर्याय उपलब्ध होणार आहे.*

# पनवेल परिसरात दोन खून

**पनवेल : वार्ताहर**

रंगपंचमीचा उत्सव साजरा होत असताना कामोठे व तळोजा येथे दोन वेगवेगळ्या घटनेत दोन व्यक्तींवर झालेल्या हल्ल्यात प्राण गमावण्याची वेळ आली आहे. यातील पहिली घटना कामोठे उपनगरात घडली तर दूसरी घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये घडली. या घटनेतील मृतांची नावे राहुल बुमबक आणि राजू बासूमतारी असे आहे.

पहिली घटना कामोठे येथील सेक्टर १४ मधील गावदेवी मंदीराजवळ घडली असून, २३ वर्षीय राहुल बुमबक याचे लग्न झाले होते. स्वच्छतेचे काम करणा-या राहुलच्या घराजवळ राहणारे त्याला ओळखणारे १९ वर्षीय गौरव पवार आणि प्रेम पेठकर यांची शुल्लक कारणावरून राहुलसोबत भांडण झाले होते. रंगपंचमी संपल्यावर राहुल गावदेवी मंदीराजवळील जांभळाच्या झाडाशेजारी उभा होता. यावेळी गौरव आणि प्रेमसुद्धा उभे होते. राहुल हा सतत का पाहतो या शुल्लक कारणावरून प्रेम याने राहुलला पकडून ठेवले काही क्षणात गौरव तेथे चाकू घेऊन आला आणि त्याने राहुलच्या पोटात वार केले. अति रक्तस्त्रावामुळे राहुलचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे आणि पोलीस निरीक्षक मनोहर पगार यांना मिळाल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत तायडे, गणेश दळवी, अरविंद मसलकर, पोलीस हवालदार संजय झोळ व इतर पोलीस पथकाने गौरव आणि प्रेम यांना अटक केली.




दूसरी घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमधील घोट गाव ते नितळस गावाकडे जाणा-या रस्त्यावरील प्लॉट क्रमांक टी ३ येथे रात्री सव्वा नऊ वाजण्याच्या सूमारास घडली.

खैरणे गावात भाड्याने राहणारा आणि मूळचा आसाम राज्यातील राजू बासूमतारी (वय २९) याला एका कंपनीच्या रखवालदाराने लोखंडी पाईपने डोक्यात प्रहार केल्याने त्याचा मृत्यू झाला. या रखवालदाराने का मारहाण केली याचा जाब विचारणा-या अजून एका तरूणाला सुद्धा या रखवालदाराने मारहाण केली. राजू हा सायकलीने या रस्त्यावरून जात होता. रखवालदार मद्याच्या धुंदीत असल्याने त्याने रस्त्यावरून जाणाऱ्या सायकलस्वार राजू आणि दुचाकीस्वारावर लोखंडी पाईपने हल्ला केला.

यामध्ये राजू याचा मृत्यू झाला. तळोजा पोलिसांनी बुधवारी सकाळी संबंधित रखवालदाराविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# अल्पवयीन मुलीवर जीवघेणा हल्लाप्रकरणी आरोपीस सहा वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

**माणगाव : पत्रकार**

महाड शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या अल्पवयीन मुलीवरील जीवघेण्या हल्ल्याच्या प्रकरणात माणगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपीस सहा वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. अल्पवयीन मुलीला मानसिक त्रास देत तिच्यावर काचेच्या फुटलेल्या बाटलीने हल्ला करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याबद्दल न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवले.

सदर घटना २८ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी ११.५५ वाजण्याच्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गावरील आंबेडकर कॉलेज समोरील पुलावर घडली होती. आरोपी सारळ उर्फ सॅरल सुनील शिंदे (वय २०, रा. दहिवाड, ता. महाड) याने अल्पवयीन फिर्यादी मुलीवर रिलेशन मध्ये राहण्याचा दबाव टाकत सतत वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकांवरून फोन करून शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या होत्या. घटनेच्या दिवशी फिर्यादी मुलगी कॉलेजला जात असताना आरोपीने तिचा रस्ता अडवून धक्काबुक्की केली. त्यानंतर जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फुटलेल्या काचेच्या बाटलीने तिच्या मानेवर वार करून गंभीर दुखापत केली.

सदर खटल्याची सुनावणी माणगाव, रायगड येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात झाली. सरकार पक्षाच्या वतीने अतिरिक्त शासकीय अभियोक्ता योगेश तेंडूलकर यांनी प्रभावी युक्तिवाद केला. फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी तसेच तपासी अधिकाऱ्यांच्या साक्षी न्यायालयाने ग्राह्य धरल्या. मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. टी. भालेराव यांनी ४ मार्च २०२६ रोजी निकाल देताना आरोपीस ६ वर्ष सक्तमजुरी व एकुण रु. ७,००० दंडाची शिक्षा सुनावली.

# १८ लाख ७६ हजारांचे दागिने चोरणाऱ्यांना अटक

**खोपोली , चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीसांनी चोरीस गेलेले १८ लाख ७६ हजाराचे दागिने शोधून आरोपीच्या मुसक्या आवळल्या, त्यामुळे खालापूर पोलीस यांचे अभिनंदन होत आहे.

गुन्ह्यातील फिर्यादी हे आपल्या पत्नीसह नातेवाईकांचे विवाह सोहळ्याकरीता खालापूर तालुक्यातील मौजे खैराट गांवचे हद्दीत सॉल्ट रिसोर्ट अ‍ॅन्ड ओलियंडर फार्म येथे आले होते. त्यांच्या रूममध्ये त्यांना किंमती वस्तू दागिणे, व रोख रक्कम ठेवण्यासाठी हॉटेल मधून लॉकर




दिला होता. त्या लॉकरमध्ये त्यांनी त्यांचेकडील सोन्याचे व हि-यांचे दागिणे व रोख रक्कम लॉकरमध्ये ठेवून लग्न हळदी समारंभा करीता रूम बाहेर गेले असता अज्ञात आरोपी यांनी बंद रूमचा दरवाजा उघडून रूममध्ये प्रवेश करून मास्टर पासवर्डने लॉकर उघडून लॉकर मधील १८,७०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे व हि-यांचे दागिणे व रोख रक्कम ६५००/- रूपये चोरून नेले होते. सदर गुन्ह्याची नोंद दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आली होती.मात्र खालापूर पोलीस यांच्याकडे कोणताही पुरावा हाती नव्हता तपास अधिकारी सचिन पवार व अंमलदार यांनी गुन्हयाचा तांत्रिक तपास करून सिक्युरिटी गार्ड, रूमबॉय मयूर किसन आगीवले वय वर्ष २४, प्रवीण सगणे वय वर्ष २५ व ओमकार सरोदे वय वर्ष २५ यांना ताब्यात घेतले असता त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

# खालापूर उपनगराध्यक्षपदासाठी किशोर पवारांचा एकमेव अर्ज दाखल

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

संतोष जंगम यांनी आपल्या खालापूर उपनगराध्यक्षपदाचा स्वेच्छेने राजीनामा दिला असून त्या अनुषंगाने ६ फेब्रुवारी रोजी उपाध्यक्षपदाची निवडणुक जाहीर करण्यात आली आहे. आमदार महेंद्र थोरवे यांच्या आदेशानुसार किशोर पवार यांच्या नावाला सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. त्यानुसार बुधवारी (दि.४ ) सकाळी ११ वाजता नगरपंचायत सभागृहात नवीन उपनगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला.

या निवडणुकीत एकूण एकच अर्ज प्राप्त झाला. यामुळे किशोर पवार यांची उपनगराध्यक्षपदी निवड होणार ही आता फक्त



औपचारिकता राहिली आहे. पवार समर्थक व शिवसेना शिंदे गटात आनंदाचे वातावरण पहायला मिळाले. अखेर किशोर पवार यांना न्याय मिळाला अशी भावना कार्यकर्त्यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी मुख्याधिकारी कोमल कराळे, नगराध्यक्ष रोशना मोडवे, माजी उपनगराध्यक्ष संतोष जंगम, नगरसेविका लता लोते, उज्वला निधी, सुनीता पाटील, मिनल कबले, मीना पवार, सुप्रिया साळुंखे, नगरसेवक निशांत पानपाटील, दिनेश फराट, महेश जाधव, कर्जत विधानसभा युवा सेना अध्यक्ष रोहित विचारे, अमित जगताप युवासेना अधिकारी, हरेश मोडवे खालापूर शहर युवा सेना समन्वयक, किशोर पाटील, गणेश कबले, वसंत पवार, उद्धव घोलप, मोहन घोलप, कृष्णकांत जोगवडे, रामचंद्र घोलप, वसंत जाधव, रोहिदास पवार, संदीप पवार, पांडुरंग मगर, दीपक पाटील, चंद्रकांत पवार, योगेश पवार, सचिन घोलप, राकेश पवार, नयन पारठे, हनुमंत पारठे, गोविंद घोलप, सौरभ घोलप, निखिल घोसलकर, सौरभ पवार, हरीश उतेकर, श्रीकांत पारठे, मनेश जोगावडे, मुकुंद पारठे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# माणगाव नगरपंचायत विषय समिती सभापतींची निवडणूक बिनविरोध

**माणगाव: प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायतीच्या विषय समिती सभापती यांची निवडणूक बुधवार दि.४ मार्च रोजी बिनविरोध झाली असून या निवडणुकीत स्वच्छता,आरोग्य व क्रीडा समिती सभापतीपदी नगरसेवक आनंद शिवराम यादव,पाणी पुरवठा,सामाजिक न्याय व शिक्षण समिती सभापतीपदी नगरसेवक अजित चंद्रकांत तारलेकर,नगरपंचायतीच्या महिला,बालकल्याण व युवक कल्याण समिती सभापतीपदी नगरसेविका नंदिनी नितीन बामगुडे यांची बिनविरोध निवडून करण्यात आली असून



नगरसेविका रश्मी सागर मुंढे यांची महिला व बालकल्याण समिती उपसभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली नगरपंचायतीचे बांधकाम,नियोजन व दिवाबत्ती समिती सभापती पदसिद्ध उपनगराध्यक्षा रिया रत्नाकर उभारे हे कामकाज पाहत असून या सर्वांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

सर्व नवनिर्वाचित सभापती,उपसभापती यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कोकण विभागीय प्रवक्ता अँड.राजीव साबळे,नगराध्यक्षा शर्मिला सुर्वे,मुख्याधिकारी संतोष माळी व नगरसेवकांनी अभिनंदन केले


पान १ वरुन

## सरकारकडून सर्वतोपरी प्रयत्न

मुख्यमंत्री म्हणाले, युद्ध सुरू झाल्यानंतर काही एअर स्पेसेस बंद आहेत, तर काही सुरू आहेत. जिथून आणणे शक्य आहे, तिथून आपण लोकांना आणत आहोत. कुवैतमध्ये समस्या आली होती. काही जणांना व्हिसाच्या अडचणी होत्या. दूतावासाने प्रयत्न करून त्यांना एका ठिकाणी थांबवलेले आहे. त्यांना अडचण येणार नाही, असा प्रयत्न आपल्या वतीने करण्यात आला. हेल्पलाइनच्या माध्यमातून जी मदत करणे शक्य आहे, ती करत आहोत. पाच-दहा वर्षांतील अनुभव बघितला तर पर्यटक असो किंवा विद्यार्थी असो, केंद्र सरकार संवेदनशील आहे. विपरित परिस्थितीचा सामना करत लोकांना परत आणले आहे.

सद्यस्थितीबद्दल राज्य सरकारने केंद्राशी चर्चा करून भूमिका मांडली होती की, जे काही महाराष्ट्रातील लोक आहेत, त्यांना परत आणण्यासाठी व्यवस्था करू इच्छितो, परंतु केंद्राने सांगितले की, सगळ्याच राज्यांनी अशा प्रकारची भूमिका घेतली, तर गोंधळ होईल. एअरस्पेस सुरक्षित नाही. असुरक्षित एअरस्पेसमध्ये एखादे विमान गेले तर काय होऊ शकतो हे आपण समजू शकतो. केंद्र सरकार प्रयत्न करत आहे. आम्हाला लोकांचे मेसेजेस येतात. आम्ही परराष्ट्र मंत्रालयाला कळवतो, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## उज्वल भविष्यासाठी मेहनतीशिवाय पर्याय नाही -लोकनेते रामशेठ ठाकूर




प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्था आणि महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला तसेच पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. उपप्राचार्य व कार्यक्रमाचे कार्यवाह डॉ. रमेश म्हात्रे यांनी महाविद्यालयातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर केला. अमिषा भगत या विद्यार्थिनीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त भाषण केले.

कार्यक्रमास रजिस्ट्रार अनंता जाधव, माजी उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, डॉ.एन.आर.मढ़वी, सुनिता काटकर, ललिता औचिते, प्रा. सतीश ढगे, विद्यार्थी परिषद अध्यक्ष ममता चव्हाण, सचिव हर्षदा नाईक हेही उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रवीण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, डॉ.यशवंत उलवेकर व प्रा. शरयू नाईक यांनी केले, तर उपस्थितांचे आभार ममता चव्हाण हिने मानले.

# रायगड जिल्ह्यात शनिवारपासून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर



**अलिबाग : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानांतर्गत रायगड जिल्हयातील प्रत्येक तालुक्यामध्ये मंडलस्तरावर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचा प्रारंभ शनिवारी ( दि . ७) करण्यात येणार आहे, अशी माहिती रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी जिल्हयातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान आयोजित करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे.मार्च ते मे असे तीन महिने हे अभियान मंडलस्तरावर राबविण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यातील. ८२ मंडळांमध्ये १११ शिबिर घेण्यात येणार आहेत. लोकसेवा कायद्यातील ९५ सेवाबाबतेच्या तक्रारींचा निपटारा या शिबिरामध्ये करण्यात येणार आहे. प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क, लोकसेवा हक्क कायदा-तात्काळ सेवा, अकृषक तरतुदीसंदर्भातील सुधारणा बाबत मार्गदर्शन, भूसंपादन केलेल्या व अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी-जास्त पत्रके तयार करून गाव दप्तर अद्ययावत करणे.

इज ऑफ डूइंग सुधारणा व नागरी सुविधा देणे या सेवा या शिबिरामध्ये देण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.एकत्रित कुटुंबांच्या जमिनींचे हिस्से झाले नसतील तर ते काम देखील या शिबिरामध्ये केले जाणार आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

# रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची श्रीवर्धनला भेट

**श्रीवर्धन : बातमीदार**

रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी १ मार्च रोजी श्रीवर्धन शहराला भेट दिली. श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांकडून झालेले अनेक अपघात व पर्यटकांकडून वारंवार स्थानिकांना होणारा उपद्रव याबाबतीत ही भेट महत्त्वाची मानली जात आहे.

श्रीमती आंचल दलाल यांनी पदभार स्वीकारल्यापासून श्रीवर्धनला भेट दिली नव्हती. त्या अनुषंगाने त्यांनी शहराला व तालुक्याला भेट दिली. श्रीवर्धन येथे सर्व व्यापारी, पर्यटन व्यावसायिक व शांतता कमिटी सदस्य यांची एकत्रित बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी श्रीवर्धन शहरात वाहतूक कोंडी ही नित्याचीच झालेली आहे. त्यावरती एकेरी मार्ग करून तोडगा काढण्याचे ठरले. तसेच श्रीवर्धन पोलीस ठाण्यासाठी जसवली तळे व दिघी सागरी पोलीस ठाण्यासाठी वडवली फाटा या ठिकाणी पोलीस चेकपोस्ट उभारण्याचे ठरविण्यात आले आहे. जेणेकरून येणाऱ्या मद्यपी पर्यटकांना आळा बसेल.श्रीवर्धन समुद्रकिनारा पाहण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत आहेत परंतु त्यांना दोन ते तीन ठिकाणी चेकिंगला सामोरे जावे लागल्यास पर्यटकांची संख्या कमी होईल. यासाठी एकाच ठिकाणी चेक पोस्ट उभारण्याचे ठरले.



## निवडक

### अज्ञाताकडून पाच झाडांची कत्तल

**पनवेल :** खारघर शहरात सेक्टर ३४ सी मधील पालिकेच्या भूखंड क्रमांक ३७ वर अज्ञात व्यक्तीने पाच झाडांची कत्तल केल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. रहिवासी अ‍ॅड. संदीप खाकसे यांनी याबाबत पालिकेच्या वृक्षप्राधिकरण विभागाने शोध घेऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. पालिकेचे उपायुक्त स्वरूप खरगे यांच्याकडे याबाबत तक्रार प्राप्त होताच त्यांनी वृक्ष प्राधिकरण विभागाचे प्रमुख संदीप पवार यांना पाहणी करण्याच्या सूचना केल्यानंतर त्यांनी संबंधित झाडांचा पंचनामा केला आहे. खारघरमध्ये वृक्ष कत्तलीचे प्रकार सुरू असून, प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप खाकसे यांनी केला आहे.

### साडेचार लाख रुपयांची फसवणूक

**पनवेल :** गॅस कनेक्शनच्या महिन्याचे बिल अपडेट करण्यास सांगून चार लाख ६४ हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. भूपेंदर कौर मोहिंदर सिंग या खारघर, सेक्टर २० येथे राहत असून त्यांना महानगर गॅस लिमिटेड संबंधी मोबाईलवर मेसेज आला आणि गॅस कनेक्शन डिस्कनेक्ट होणार असल्याचे सांगून महिन्याचे बिल अपडेट करण्यास सांगितले. त्यावेळी त्यांनी बिल भरले असल्याबाबतचा मेसेज समोरच्या मोबाईलवर पाठवला. त्यानंतर मी वरिष्ठ अधिकारी बोलत असल्याचे सांगून ते त्यांच्यासोबत व्हॉट्सअ‍ॅप कॉलवर बोलू लागले आणि मोबाईलवर क्लिक करत गेले आणि मोबाईलची पूर्ण स्क्रीन त्यांना शेअर झाली आणि त्यांच्या बँकेतून चार लाख ६४ हजार रुपये वळते करण्यात आले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच गुन्हा दाखल करण्यात आला.

### करंजाडेत एकाचा मोबाईल हिसकावला

**पनवेल :** पायी चालणाऱ्या ४१ वर्षीय व्यक्तीकडील मोबाईल हिसकावून अनोळखी ईसम मोटरसायकलवरून पसार झाला. या प्रकरणी २ मार्च रोजी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मंगेश सुखसे हे सेक्टर चार, करंजाडे येथे राहत असून ते दोन मार्च रोजी सकाळी साडेपाचच्या सुमारास वडाळे तलाव, पनवेल येथे चालण्यासाठी गेले होते. यावेळी त्या ठिकाणी ते कट्ट्यावर बसले. काळी केटीएम मोटरसायकलवरून अनोळखी व्यक्ती त्यांच्याजवळ आला आणि त्यांच्या हातातील ७० हजार रुपये किमतीचा मोबाईल खेचून तो पळून गेला.

### स्कुटीची ट्रेलरला धडक, दोघांचा मृत्यू

**पनवेल :** ट्रेलरला स्कुटीने धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली. २८ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास असद मेनन समशद (वय १९, रा. सेक्टर २० सीवूड) आणि मुस्कान संजय सिंग (वय २०, रा. ट्रॅक्टर २० नेरूळ पूर्व) हे स्कुटी (एमएच ०३ ईसी ७६४१)ने पुण्याकडून पनवेल कडे जात होते. स्कूटीने जुना मुंबई पुणे हायवे पनवेल लेनवर कोन बीट पोलीस चौकी समोर अशोक लेलँड कंपनीचा ट्रेलर (एमएच ४३ यु ६५६६)ला समोरून उजव्या बाजूने ठोकर मारली. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले आणि दोघांचाही मृत्यू झाला.

# जेएनपीएत दोन हजार कंटेनर अडकले

## ◆ केळी, कांदा, द्राक्ष फळांचा समावेश; माल खराब होण्याची भीती

**उरण : प्रतिनिधी**

मध्यपुर्व व परिसरातील देशांमध्ये पेटलेल्या युद्धामुळे अत्यंत तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. इराण आणि संपूर्ण अरबी द्वीपकल्पात सुरू असलेल्या युद्धाच्या घडामोडींमध्ये जहाजांवरील क्रू मेंबर्स, जहाजे आणि कंटेनर माल व मालवाहू जहाजांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी शिपिंग कंपन्यांनी आयात निर्यातीच्या करण्यात येणाऱ्या प्रत्येक कंटेनरवर २ मार्चपासून अतिरिक्त २ हजार ते चार हजार अमेरिकन डॉलर्स इतका आपत्कालीन संघर्ष अधिभार लावण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

या अतिरिक्त अधिभारामुळे आयात-निर्यात व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान सहन करावा लागणार आहे. दरम्यान, उद्भवलेल्या या युद्धाच्या परिस्थितीमुळे जेएनपीए बंदरात केळीचे १ हजार आणि कांदा, द्राक्षांचे १ हजार असे एकूण दोन हजार कंटेनर अडकले असल्याची माहिती निर्यातदार व्यापारी



आणि जेएनपीएने अधिकृतपणे दिली.

मध्यपुर्व व परिसरातील देशांमध्ये भडकलेल्या युद्धामुळे समुद्रमार्गे होणाऱ्या कंटेनर मालाच्या आयात-निर्यातीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला आहे. कारण होर्मुझची खाडी मालवाहू जहाजांना कधीही बंद अथवा खुली केली जात आहे.

या खाडीत जहाजांवरही हल्ले होण्याची अधिक भीती आहे. त्यामुळे शिपिंग कंपन्यांनी युद्धजन्य देशांमध्ये व त्यामधून आयात निर्यात होणाऱ्या कार्गो कंटेनर अद्याप तरी डिस्चार्ज किंवा लोड केलेले नाहीत, मात्र युध्दजन्य प्रभावित क्षेत्रांमध्ये ऑपरेशन्स सुरक्षित करण्यासाठी खबरदारीचे उपाय म्हणून शिपिंग कंपन्यांनी आपत्कालीन संघर्ष अधिभार लावण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

यामध्ये युद्धाच्या घडामोडींमध्ये जहाजांवरील क्रू मेंबर्स, जहाजे आणि कंटेनर माल व मालवाहू जहाजांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी शिपिंग कंपन्यांनी आयात निर्यातीच्या करण्यात येणाऱ्या प्रत्येक कंटेनरवर २ मार्चपासून आपत्कालीन संघर्ष अधिभार लावण्याचे दरही जाहीर केले आहेत.

बहरीन, कुवेत, जिबूती, ओमान, इजिप्त (ऐन सोखना बंदर), कतार, एरिट्रिया, सुदान, इराक, संयुक्त अरब अमिराती, जॉर्डन, येमेन, सौदी अरेबियाचे राज्य या देशात पाठविण्यात येणाऱ्या प्रत्येक ड्राय कार्गो कंटेनर आपत्कालीन संघर्ष अधिभार आकारण्याचा निर्णय घेतला आहे.

सीएमए सीजीएम या शिपिंग कंपनीने जाहीर केलेल्या आपत्कालीन संघर्ष अधिभारानुसार २० फूट ड्राय कंटेनरसाठी दोन हजार युएस डॉलर्स (एक लाख ८३ हजार ८४० रुपये), ४० फूट ड्राय कंटेनरसाठी तीन हजार युएस डॉलर्स (२ लाख ७५ हजार ७६० रुपये) आणि रेफर किंवा विशेष उपकरणांच्या कंटेनरसाठी चार हजार युएस डॉलर्स (तीन लाख ६७ हजार ६८० रुपये) अतिरिक्त अधिभार आकारण्यात येणार असल्याचे पत्रक काढून जाहीर केले आहे.

> **जेएनपीए बंदरात शनिवारपासून केळ्याचे एक हजार कंटेनर अडकले आहेत. त्यामध्ये आता नव्याने आपत्कालीन संघर्ष अधिभाराची भर पडली आहे. येत्या १०-१५ दिवसांत केळ्यांचे कार्गो कंटेनर निर्यात झाले नाहीत तर माल खराब होण्याची भीती आहे. अतिरिक्त अधिभार आणि माल खराब झाल्यास मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणार असल्याचे असल्याचे केळी निर्यातदार व जी फाईव्ह मार्ट वन प्रा.लि.कंपनीचे मालक शब्बीर केपी यांनी सांगितले, तर युद्ध परिस्थितीमुळे जेएनपीए बंदरात कांदा व द्राक्षांचे एकूण एक हजार कंटेनर अडकून पडले आहेत.**
>
> **-राहुल पवार, निर्यातदार व्यापारी**

> **या युद्धाच्या परिस्थितीमुळे जेएनपीए बंदरात शनिवारपासून दोन हजार कंटेनर अडकले आहेत. सध्यातरी जेएनपीए बंदरात आयात निर्यात फारसा परिणाम जाणवत नसला तरी येत्या काही दिवसात तो जाणवेल. याबाबत जेएनपीए अध्यक्ष गौतम दयाल यांच्याशीही चर्चा झाली आहे. शिपिंग कंपन्यांनी मागणी केल्यास युद्ध परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या आयात-निर्यात होणाऱ्या कार्गो कंटेनर बंदरात ठेऊन घेण्यासाठी सहकार्य करण्याची भूमिका अध्यक्षांनी अधिकृतपणे घेतली आहे.**
>
> **-गिरीश थॉमस, वरिष्ठ अधिकारी, जेएनपीए कंटेनर वाहतूक विभाग**

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा पत्रकारांकडून सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

नुकत्याच झालेल्या पनवेल महानगरपालिका तसेच रायगड जिल्हा परिषद आणि पनवेल पंचायत समिती निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या यशाच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा शाल, श्रीफळ व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.



पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत पैकी नगरसेवक भाजपचे निवडून आले असून जिल्हा परिषदेत पनवेल तालुक्यातील आठही मतदारसंघांवर भाजपचा विजय झाला आहे. तसेच पंचायत समितीतील पैकी जागांवर भाजपने विजय मिळवला आहे. या सन्मानाबद्दल प्रतिक्रिया देताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सांगितले की, जनतेने गेल्या पाच वर्षांत केलेल्या विकासकामांवर विश्वास ठेवून भाजपला विजय मिळवून दिला आहे. पत्रकार विकास मंचाने केलेल्या सन्मानाबद्दल मी त्यांचा आभारी आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार संजय कदम, मंदार दोंदे, खजिनदार दत्ता कुलकर्णी, सरचिटणीस हरेश साठे, सदस्य राजू गाडे आदी उपस्थित होते.

## परेश ठाकूर यांना पनवेल पत्रकार मंचाकडून शुभेच्छा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या ७८ जागांपैकी तब्बल ६० जागांवर महायुतीने विजय संपादित केला. स्वीकृत नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल करण्यात आले.

महायुतीच्या वतीने स्वीकृत नगरसेवक पदासाठी अर्ज भरायला निघण्यापूर्वी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पिताश्री लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी परेश ठाकूर यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून आगामी कालखंडाकरता मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांना शुभेच्छा देताना मंचाचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे खजिनदार दत्ता कुलकर्णी, सरचिटणीस हरेश साठे, सदस्य राजू गाडे यांची उपस्थिती होती.



## लोकशाही दिनी तक्रारींचे निवारण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महापालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये ४ मार्चला आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गादर्शनाखाली 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले. या बैठकित प्रभागस्तरीय विभागाचे अर्ज दाखल झाले होते, या अर्जांची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

या बैठकिस परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, प्रभाग अधिकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे, असे महापालिकेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.









**पनवेल : येथील महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकपदांसाठी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय महायुतीच्या वतीने बुधवारी अधिकृत उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. महायुतीकडून भाजपचे युवा नेते परेश ठाकूर, पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, डॉ. अरुणकुमार भगत, दिनेश खानावकर तसेच शिवसेनेचे अ‍ॅड. प्रथमेश सोमण यांनी आपले अर्ज महापालिकेचे सचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी नानासाहेब कामठे यांच्याकडे सादर केले.**

## एमएनएम विद्यालयात मराठी भाषा गौरव सप्ताह उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एमएनएम विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन करत पुष्पहार अर्पण केला.

शाळेतील विद्यार्थ्यांनी संपूर्ण आठवडा मराठी भाषा सप्ताह साजरा केला. इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी हस्ताक्षर स्पर्धा, बोधकथा, कविता गायन, बडबड गीते, मराठी शब्द संग्रह वृद्धीकरिता सापशिडी स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले. मराठी संस्कृती, मराठी अस्मिता, सण, परंपरा, उत्सव यांचा सुंदर मिलाप असणारे मनमोहक नृत्य, विद्यार्थ्यांनी सादर केले. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी मराठी पारंपारिक नृत्य, भाषणे आणि पोवाडे यांचे उत्कृष्ट सादरीकरण केले चांगू काना ठाकूर विद्यालयाचे मराठीचे प्राध्यापक निखिलेश देशमुख यांच्या व्याख्यानाचे मराठी भाषा दिनानिमित्त आयोजन करण्यात आले.

मराठी भाषेचा गौरवशाली इतिहास, परंपरा, संस्कृती,जतन आणि संवर्धन त्याबद्दल उद्बोधक मार्गदर्शन त्यांनी केले. मराठी विभागाच्या नीलम भुरे, मनीषा पास्ते, चैत्राली कोळी, नीलिमा बागराव यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत विशेष परिश्रम घेतले.

## सीकेटी कॉलेजच्या दीपक सोनावळेंचा सेवापूर्ती गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या कर्मचारी कल्याण समितीने महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी दीपक काशिनाथ सोनावळे (प्रयोगशाळा परिचर) यांचा सेवापूर्ती गौरवदिनाचा समारंभ २८ फेब्रुवारीला उत्साहात झाला. यावेळी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांची प्रमुख उपस्थिती राहिली.



प्रास्ताविकात प्रा. प्रिया शेनॉय यांनी समितीच्या माध्यमातून आयोजित केल्या जाणाऱ्या विविधकल्याणकारी उपक्रमांचा आढावा दिला तथा समारोहाचे सत्कारमूर्ती दीपक सोनावळे यांचा परिचय देत, त्यांच्या संस्थेमधील ३० वर्षांच्या प्रदीर्घ सेवेचा उल्लेख केला.

यानंतर तानाजी देशमुख, डॉ. सत्यजित कांबळे, प्रो. डॉ. बी. डी. आघाव, डॉ. आर. ओ. परमार यांनीही मनोगत आणि भावना यांची अभिव्यक्ती केली. यासोबतच दीपक सोनावळे यांच्या कुटुंबातील चिमुकली तन्वी पवार हिच्या संबोधनाने संपूर्ण वातावरण अत्यंत भावनिक बनले.

समारोहाचे अध्यक्ष जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे यांच्या हस्ते दीपक सोनावळे यांचा सेवापूर्ती झाल्याबद्दल शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, याबरोबर सत्कारमूर्तींच्या पत्नी विजया सोनावळे यांचा सत्कार विज्ञानशाखेच्या शाखाधीपती डॉ. जे.एस.ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला. अपितु महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी दीपक सोनावळे यांना निवृत्तीवेतनाचे आदेश सुपूर्द करत त्यांना पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांनी दीपक सोनावळे यांना भविष्यकालीन वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सेवापूर्ती गौरव दिनाचे अध्यक्ष तथा जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासामध्ये प्राचार्यांपासून ते शिपाईपदावर कार्यरत असणाऱ्या प्रत्येक भागधारकाचा तितकेच महत्वपूर्ण योगदान असल्याचे भाष्य केले.

यावेळी व्यासपीठावर जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील, सत्कारमूर्ती दीपक सोनावळे व त्यांच्या पत्नी विजयासोनावळे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो.डॉ. बी.डी.आघाव, विज्ञानशाखेच्या शाखाधीपती डॉ. जे.एस.ठाकूर, कर्मचारी कल्याण समितीचे अध्यक्ष डॉ. आर.ओ.परमार, कार्यालयीन अधीक्षका पी.एस.म्हात्रे, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारीवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. आकाश पाटील, तर आभार प्रदर्शन महाविद्यायाच्या प्रशासकीय कार्यालयाचे मुख्य लिपिक जी. के. सुर्वे यांनी केले.

## संपादकीय

# युद्ध अधिक समीप

अमेरिका-इस्रायल यांचे इराणसोबतचे युद्ध लवकर संपावे. संघर्षाची जागा चर्चा व मुत्सद्देगिरीने घ्यावी अशी अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आखाती देशांच्या प्रमुखांशी बोलताना व्यक्त केली. हे युद्ध दूर कुठेतरी घडते आहे असे कुणाला वाटत असल्यास या युद्धाच्या झळा भारताला आणि विशेषत: आखातातील भारतीयांना तीव्रतेने जाणवतील हे सुरुवातीपासूनच दिसले आहे. युद्धाच्या पाचव्या दिवशी बुधवारी एका अमेरिकी पाणबुडीने श्रीलंकेनजीक हिंदी महासागरात टॉर्पिडोने हल्ला करून एका इराणी युद्धनौकेला जलसमाधी दिली. भारताच्या दृष्टीने ही गांभीर्याने दखल घेण्याजोगी घटना आहे.

**आमच्याकडे अमर्याद शस्त्रसाठा आहे. आम्ही अनेक दिवस (इराणविरोधातले) हे युद्ध लढू शकतो अशी गर्जना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे इस्रायल आणि अमेरिका यांनी संयुक्तपणे इराणविरोधात पुकारलेला लष्करी संघर्ष लवकर संपुष्टात येणार की नाही याविषयी जगभरच साशंकता निर्माण झाली आहे. अमेरिकेने इराणला पूर्णपणे चिरडून टाकण्याचा, त्यांचे नौदल, लष्करी क्षमता संपूर्णपणे नामोहरम करण्याचा इरादा जाहीर केला आहे. श्रीलंकेच्या दक्षिण किनारपट्टीजवळ हिंदी महासागरात बुधवारी इराणच्या एका छोट्या युद्धनौकेवर अमेरिकी पाणबुडीने टॉर्पिडोने हल्ला केला. हल्ल्यानंतर या युद्धनौकेवरील किमान ८० जण ठार झाले असून इराणी युद्धनौकेला हिंदी महासागरात जलसमाधी मिळाली. जवळपास ३० जखमींना वाचवल्याची माहिती श्रीलंकेकडून देण्यात आली. सकाळी सहा वाजता श्रीलंकेच्या नौदलाला या युद्धनौकेकडून डिस्ट्रेस कॉल मिळाला होता. ही इराणी युद्धनौका गेल्याच आठवड्यात भारतातर्फे विशाखापट्टणम येथे आयोजित एका बहुराष्ट्रीय नौदल कवायतीत सहभागी होऊन इराणकडे परत निघाली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर प्रथमच एखाद्या पाणबुडीने टॉर्पिडोचा वापर करून शत्रूच्या युद्धनौकेला संपवले आहे असे अमेरिकेच्या संरक्षणमंत्र्यांनी बुधवारी सांगितले. युद्धाची भौगोलिक व्याप्ती वाढू लागल्याचे संकेत या घटनेतून मिळतात. या युद्धात कुठल्याही नियमांचे पालन केले जाणार नाही असे दिसत असल्याचेही तज्ज्ञ म्हणत आहेत. अमेरिका निर्णायकरित्या, कुठलीही दया न दाखवता शत्रूला उद्ध्वस्त करून जिंकत आहे असा दावाही अमेरिकेच्या संरक्षणमंत्र्यांनी केला. दरम्यान इराणमधील परिस्थिती बिकट होत चालली असून इराणचे दिवंगत सर्वोच्च नेते आयातुल्ला खामेनी यांच्यावर चार दिवस लोटूनही अंत्यसंस्कार झालेले नाहीत. तीन दिवस चालणारा अंत्यसंस्काराचा विधी पुढे ढकलण्यात आल्याचे बुधवारी जाहीर करण्यात आले. आयातुल्ला खामेनी यांचे उत्तराधिकारी म्हणून त्यांचे पुत्र मोजतबा खामेनी यांची निवड करण्यात आल्याचे मंगळवारी रात्री सांगितले गेले. मात्र खामेनी यांचे उत्तराधिकारी म्हणून निवडल्या जाणाऱ्या कोणत्याही इराणी नेत्याची हत्या करण्यात येईल असे इस्रायलच्या संरक्षणमंत्र्यांनी म्हटले आहे. ही इराणी राजवट उलथवून टाकण्यासाठी इस्रायल अमेरिकेसोबत पूर्ण ताकदीनिशी काम करत राहील असेही त्यांनी म्हटले आहे. इस्रायलने बुधवारी इराणमधील अनेक सुरक्षा चौक्यांवर हल्ला केला तर इराणने आखाती देशांतील अमेरिकी तळांवरील हल्ले सुरूच ठेवले. ओमाननजीक तेलवाहू जहाजांवरील ड्रोन हल्ल्यात तिघा भारतीयांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाहतूक बंद केली असली तरी चीनच्या जहाजांसाठी मात्र हा मार्ग खुला ठेवला आहे. एकंदर परिस्थिती पाहता या युद्धाची तीव्रता वाढण्याची चिन्हे असून जगभरातील शेअरबाजारांवर या युद्धाची छाया दिसते आहे. बुधवारी सलग तिसऱ्या दिवशी भारतीय शेअरबाजार निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टीमध्येही मोठी घसरण झाली.**

# पोलादपूर तालुक्यात प्रेत फेकून पलायनाची मालिका

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यातील स्थानिकांच्या खुनप्रकरणांचा यशस्वी तपास करणाऱ्या पोलादपूर पोलीसांना परजिल्ह्यातून प्रेत आणून फेकून पलायन करण्याच्या घटनांमध्ये तपासासाठी वरिष्ठ पोलीस यंत्रणांच्या विशेष सहकार्याची गरज असून या गुन्ह्यांच्या तपासकामी पोलीस अधिकाऱ्यांसह तपास यंत्रणांना तपासाची इच्छाशक्ती आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. कशेडी घाटातील वॉक्सवॅगन चालकाच्या खुनात एका महिलेसह तिघांना अटक करून तुरूंगात टाकणाऱ्या पोलादपूर पोलिसांना अन्य तपास यंत्रणांची साथ मिळाल्यास आंबेनळी घाटरस्त्याच्या रूंदीकरणाच्या मोरीच्या कॉंक्रीट पाईपमध्ये सापडलेल्या प्रेताचाही तपास होऊन आरोपी पकडण्याची शक्यता निर्माण होऊ शकेल.

**आंबेनळी घाटातील महिलेचे तंदुरीकांड : तपास सुरू**

आंबेनळी घाटात पोलादपूर तालुक्याच्या हद्दीत बावलीटोकच्या खालील बाजूला आणि चिरेखिंड गावाच्या वरील मुख्य घाटरस्त्यालगत अज्ञात महिलेचा जळालेला मृतदेह कॉंक्रीटच्या भिंतीच्या मोरीच्या पाईपामध्ये असल्याचे या परिसरामध्ये दूर्गंधी पसरल्याने शोध घेता आंबेनळी घाटातील रस्त्याचे काम करणाऱ्या कामगारांना आढळून आले. मृतदेह ताठरता आलेल्या अवस्थेत असल्याने जाळण्यापूर्वीच महिलेचा खुन झाल्याची प्राथमिक शक्यता दिसून आली. गुन्हे अन्वेषण विभागाने महिलेच्या प्रेताच्या आकारावरून काल्पनिक रेखाचित्र तयार करून घेतले असून ते व्हायरल होऊनही अद्याप प्रेत कोणाचे हा तपास अनुत्तरितच राहिला आहे.

**वाकण गोपाळवाडीतील खून : आरोपी मोकाटच**

वाकण गोपाळवाडीतील खुनाच्या तपासात तपासात महाबळेश्वर येथील कबीर कुटीर लॉजिंग ऍण्ड रेस्टॉरन्ट या हॉटेलचा मालक सय्यद युसुफ मलिक याने अफसर हूजूर खान मुंबई, कपिल मुळगांवकर आणि दिनानाथ गिरे यांच्यासोबत संगनमताने गुरूनाथ यालाच रेस्टॉरन्टमध्येच बेदम मारहाण करून व तीक्ष्ण हत्याराने भोसकून ठार मारले. यातील मुख्य आरोपी हॉटेलचा मालक सय्यद युसूफ मलिक आणि त्याचा मुलगा अतिक यांच्या शोधासाठीचे प्रयत्न तपासिक पोलीस अधिकाऱ्यांच्याच बदलीमुळे रखडले. परिणामी, गुन्हा र.नं. १८-२०१३ अद्याप तपास अपूर्णच राहिलेला आहे.

**जळके पुरूषाचे प्रेत तपास यशस्वी**

मोरगिरी फौजदारवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सकाळी पोलादपूरकडे कॉलेजमध्ये जाण्यासाठी पायी चालत निघालेल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना मोरगिरीजवळील खिंडीमध्ये एक काळया बाहुल्यासारखी भयावह आकृती रस्त्यालगत पडलेली दिसून आल्याने त्यांनी भितीपोटी पुढे जाण्याचे टाळून माघारी घरी परत येऊन पालकांना ही माहिती दिली. माजी पोलीस पाटील सहदेव जाधव यांनी घटनेची खबर दिली.सुमारे २५ ते ३० वर्षे वयाच्या अज्ञात व्यक्तीचा गळा आवळून खून केल्यानंतर त्यास याठिकाणी आणून जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला असल्याचे सकृतदर्शनी आढळून आले. याप्रकरणी गुन्हा र.नं. ४१२०१३ नुसार नोंद करण्यात आली. यानंतर मृताचे नांव शोधून काढण्यापर्यंतच पोलादपूर पोलीसांना यश आले.

**भोगाव दत्तवाडीतील प्रेत : तपास रखडलेला**

भोगाव दत्तवाडी रस्त्याच्या डोंगरउतारावरील मातीच्या ढिगाऱ्यावर एका अज्ञात इसमाचे मान कापून खून केलेल्या अवस्थेत प्रेत आढळून आले. याठिकाणी दारूची व पाण्याची बाटली, एक चटई, पिवळ्या धातूमध्ये गुंफलेले रूद्राक्षाचे ब्रेसलेट, डोक्यात घातलेला रक्ताने माखलेला दगड अशा खून केलेल्या जागेच्या खुणा असून तेथून सुमारे १०० फूट अंतरावर मातीच्या ढिगाऱ्याच्या मागील बाजूस रस्त्यापासून काही अंतरावर खून केल्यानंतर या इसमाचे अंगावरील सर्व कपडे काढून प्रेत फरफटत नेऊन फेकून देण्यात आले असावे, असा निष्कर्ष पोलीसांनी काढला. पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये याबाबत गुन्हा रजिस्टर ६१२०१३ नुसार दाखल करण्यात आला आणि तब्बल वर्षानंतर डिसेंबर २०१४ मध्ये पोलीसांनी मृताचे अधिकृत छायाचित्र वृत्तपत्रांना प्रसिध्दीस देऊन ओळख पटविण्याचे आवाहन केले. अद्याप मृताची ओळख न पटल्याने पुढे तपास सुरू झालेला नाही.

**महिलेच्या खुनाचा तपास अपूर्णच राहतो?**

यानंतर फेब्रुवारी २०१५मध्ये पोलादपूर तालुक्यातील रानकडसरी येथील पोलीस पाटील ज्ञानदेव चव्हाण यांनी दिलेल्या खबरीनुसार आंबेनळी घाटातील दक्षिणटोंक भागामध्ये दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास एका अज्ञात तरूणीचे अर्धनग्न अवस्थेतील छिन्नविछिन्न कुजून उन्हात सुकलेले प्रेत दिसून आल्याची माहिती पोलादपूर पोलीसांना मिळाली. प्रेताचा गळा ओढणीने फास बांधून आवळला असल्याचे दिसून आले. सध्या या गुन्हयाची नोंद अकस्मात मृत्यू बेवारस प्रेत अशी करण्यात आली असून याप्रकरणी पुढील तपास ठप्प आहे. मात्र, प्रेताची ओळख न पटल्याने हा गुन्हा खून आहे अथवा कसे याबाबत अद्याप प्रश्नचिन्ह कायम आहे.

**पुरुषाचे प्रेत : महिलेने केला खून**

पोलादपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३० एप्रिल २०२५ रोजी जुन्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील दरीभागात एका अज्ञात इसमाचे साधारणत: तीन दिवस कुजलेले प्रेत कॉंक्रीटच्या संरक्षक भिंतीपलीकडे आढळून आले. या घटनेनंतर पोलादपूर पोलिसांनी तांत्रिक व मानवी गुप्त माहितीच्या आधारे मृतदेहाची ओळख पटवत तातडीने तपास करताना केवळ चारच दिवसांनी अक्षय जाधव या तरूणाला पोलादपूर पोलीसांनी तपासाअंती ताब्यात घेतले. महाराष्ट्र व कर्नाटक राज्यांच्या सीमावर्ती भागातून आरोपी वंदना पुणेकर आणि मोहन सोनार या दोघांना गुप्त माहितीच्या आधारे ताब्यात घेण्यात आले.

**डोंबिवलीतील ठेकेदारावर गोळीबार व साथीदाराचे अपहरण करून हत्या**

पार्ले येथील लॉकडाऊनपुर्वीचा अकस्मात मृत्यू घेतोय उत्कंठावर्धक वळण
पोलादपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पार्ले बौध्दवाडी येथे जयेंद्र मारूती साळवी याचा दि.१३ मार्च २०२० रोजी अकस्मात मृत्यू झाल्याची नोंद झाल्यानंतर काही कालावधीने बळवंत मोरे याला आरोपी करण्यात आले. लॉकडाऊन सुरु झाल्याने तब्बल तीन महिन्यांनी यातील आरोपीला परराज्यातून ताब्यात घेण्यात आले,

**पोलादपूर तालुक्यातील माटवण येथे ज्येष्ठ शिवसैनिकाची हत्या**

पोलादपूर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्हा रजिस्टरमध्ये मयत गणपत विश्राम मांढरे (५५) व फिर्यादी अतुल मांढरे यांचे आरोपींसोबत वाद असून सर्व आरोपी एकाच गाव परिसरातील असल्याचे तसेच शिवसेना आणि शेतकरी कामगार पक्ष या दोन राजकीय पक्षांच्या वर्चस्वावरून हा वाद सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या वादावरून वैमनस्य झाल्यावरून आरोपींनी रविवार, दि. ३१ मे २०२० रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास गैरकायद्याच्या मंडळींची गर्दी जमवून कट रचून गणपत मांढरे हे त्यांच्या मोटारसायकलवरून विलास गोगावले यांच्या गुरांच्या वाड्याजवळून माटवण येथून कामानिमित्त बाहेर जात असताना त्यांना रस्त्यात अडवून कोणत्यातरी हत्याराने मारहाण करून जिवे ठार मारले आरोपींना राजकीयदृष्टया अटीशर्तीवर जामिनावरही सोडण्यात आले आहे.

दरम्यान, गुन्हा र.नं. १८२०१३ नुसार नोंद करण्यात आली असून भा.दं.वि. ३०२, २०७ प्रमाणे आरोपींविरूध्द कारवाई करण्यात येत असून यातील मुख्य आरोपी कबीर कुटीर लॉजिंग ऍण्ड रेस्टॉरन्ट या हॉटेलचा मालक सय्यद युसूफ मलिक आणि त्याचा मुलगा अतिक यांच्या शोधासाठी पोलादपूर पोलीसांची दोन पथकं त्यांचा शोध घेत असल्याची माहिती पोलीस इन्स्पेक्टर विजय द.कदम यांनी माहिती दिली आहे.

नाणेघोळ गावातील सौ.अनिता अशोक शेलार (४०,गृहिणी) हिचा शेतामध्ये जळून मृत्यू झाल्याची खबर गुरूवार, दि. ३ नोव्हेंबर २०११ रोजी पोलादपूर पोलीसांना प्राप्त झाली. पोलीस नाईक गणेश पवार आणि पोलीस हवालदार प्रकाश पाशिलकर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता त्यांना मृतदेहाच्या गळयाजवळील भाग जळला नसल्याचे दिसून आले. परिसरात गवत जळल्याचे अथवा वणवा लागल्याचे कोणतेही लक्षण दिसून आल्याने त्यांचा संशय बळावला. मात्र, यावेळी मृतदेह पोलादपूर ग्रामीण रूग्णालयात पंचनाम्यानंतर आणून पोस्टमॉर्टेम करण्यात आले. याकामी त्याला त्याचा चुलत मेव्हणा लक्ष्मण हनुवती रिंगे याने पत्नीचा गळा आवळताना पाय धरण्यास मदत केल्याचे सांगितले. लक्ष्मण रिंगे याने प्रेत जाळून पुरावा नष्ट करण्यासाठी रॉकेलचा भरलेला कॅनही अशोक शेलार याला दिल्याचे त्याने यावेळी सांगितलेअशा गुन्ह्यांच्या विशेष तपासाठी पोलीस यंत्रणांच्या विशेष सहकार्याची गरज असून पोलीस अधिकाऱ्यांसह तपास यंत्रणांची इच्छाशक्ती आवश्यक आहे.

## बदलते तंत्रज्ञान



### तुमच्या नावावर किती सिम ॲक्टिव्ह आहेत?

आजच्या डिजिटल काळात आधार कार्ड आणि मोबाइल क्रमांक या दोन्ही गोष्टी खूप आवश्यक आहेत. आधार कार्ड बँक, नोकऱ्या, सरकारी सेवांसाठी प्रमुख ओळख आणि कागदपत्र म्हणून काम करते, तर मोबाइल फोन आपल्याला इतरांनाही कनेक्ट ठेवण्यास मदत करतो. याचबरोबर या दोन्ही गोष्टींचा एकमेकांशीसुद्धा संबंध आहे. म्हणजेच आधार कार्डचा वापर मोबाइलमधील सिम कार्ड खरेदी करण्यासाठी केला जातो. पण, या प्रक्रियेत अनेकदा फसवणूक किंवा गैरवापरसुद्धा होऊ शकतो. तर हे टाळण्यासाठी तुमच्या आधारकार्ड अंतर्गत किती सिम ॲक्टिव्ह आहेत हे जाणून घेणेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. दूरसंचार विभागाच्या (डॉट्) नियमांनुसार, एखादी व्यक्ती एका आधार कार्डशी जास्तीत जास्त नऊ सिम कार्ड लिंक करू शकते. ही मर्यादा ओलांडल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. तुमच्या आधारशी किती नंबर लिंक केले आहेत याबद्दल तुम्हाला खात्रीनसल्यास, तुम्ही काही मिनिटांत ऑनलाइन तपासू शकता.



१. पहिल्यांदा टेलिकॉम ऑपरेटरच्या वेबसाइटला भेट द्या तुमच्या दूरसंचार ऑपरेटरच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या 'आधार लिंकिंग' किंवा 'व्हेरिफाय नंबर' पर्याय शोधा. तुमच्या आधार कार्डचे डिटेल्स लिहा आणि सबमिट करा. नंतर तुमच्या नोंदणीकृत मोबाइल नंबरवर एक ओटीपी मिळेल.तुमच्या आधारशी लिंक केलेल्या ॲक्टिव्ह क्रमांकांची यादी पाहण्यासाठी ओटीपी एंटर करा.

२.तुमच्या मोबाइल फोनवरून **१२१ * डायल करा. लिंक केलेले मोबाइल नंबर तपासण्यासाठी ऑन-स्क्रीन माहितीचे अनुसरण करा.याव्यतिरिक्त तुम्ही संचार साथी पोर्टल वापरून आधार कार्डशी लिंक केलेले सिमसुद्धा तपासू शकतासरकारने आधारशी लिंक केलेले मोबाइल नंबर ट्रॅक करण्यासाठी संचार साथी पोर्टल सुरू केले आहे. त्यासाठी तुम्हाला सगळ्यात आधी संचार साथी पोर्टलच्या वेबसाइटला जावे लागेल.नंतर सिटीझन सर्व्हिस सेंटवर क्लिक करा.'नो युवर मोबाइल कनेक्शन(T-FCOP)' हा पर्याय निवडा.तुमचा नोंदणीकृत मोबाइल नंबर एंटर करा आणि तुमच्या फोनवर पाठवलेला ओटीपी वापरून पडताळणी केल्यानंतर तुम्हाला तुमच्या आधारशी लिंक केलेल्या मोबाइल नंबरची यादी दिसेल.

# भारतीय गायिका गंगुबाई हनगल



**निमित्त**

गंगुबाई हनगल या हिंदुस्तानी शास्त्रीय परंपरेतील आणि किराणा घराण्याच्या गायिका होत. जवळजवळ सात दशकांच्या कारकिर्दीत ख्याल शैलीतील गाण्यांच्या सादरीकरणासाठी त्यांचे विशेष कौतुक झाले.


हंगल यांचा जन्म १३ मार्च १९१३, धारवाडमध्ये एका संगीत कुटुंबात झाला. त्यांची आई आणि आजी दोघेही कर्नाटक परंपरेतील स्थापित संगीतकार होते, जरी त्यांच्या आईलाही हिंदुस्तानी संगीतात खूप रस होता. हंगल यांनी भारतीय संगीताची मूलतत्त्वे - विशेषत: पारंपारिक सरगम किंवा स्वररचना , अक्षरे वापरून गाण्याचे तंत्र आईकडून शिकले आणि किशोरावस्थेत पोहोचण्यापूर्वीच सार्वजनिकरित्या सादरीकरण करण्यास सुरुवात केली. १३ वर्षांची असताना, हंगल यांनी धारवाडमधील हुबळी शहरातील एका संगीत अकादमीमध्ये हिंदुस्तानी परंपरेचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली . वयाच्या १५ व्या वर्षी त्या सद्गुणी हिंदुस्तानी गायिकेची शिष्य बनल्या.

सवाई गंधर्व, जे किराणा घराण्याचे प्रवर्तक होते त्यांनी हंगल यांना आपला शिष्य म्हणून घेतले,तेव्हा ते दुसरीकडे रहात होते . पण हंगल जेव्हा जेव्हा त्यांच्या मालमत्तेची तपासणी करण्यासाठी त्या भागात येत असत तेव्हा ते त्यांच्यासोबत अधूनमधून प्रशिक्षण घेत असत. दरम्यान, ती त्यांच्या आई आणि आणखी एक स्थानिक संगीतकार दत्तोपंत देसाई यांच्याकडे अभ्यास करत असे. गंधर्व त्यांच्या गावी परत येण्यास जवळजवळ एक दशक उलटले आणि हंगल त्यांच्यासोबत अधिक सखोलपणे काम करू शकले. १९४१मध्ये त्यांची तब्येत बिघडू लागेपर्यंत, तिने जवळजवळ दररोज गंधर्वांसोबत तीन वर्षे अभ्यास केला. पुढच्या वर्षी गंधर्वांचे निधन झाले. गुरुंसोबत तुलनेने कमी आणि तुरळक शिष्यत्व असूनही, हंगल यांच्यावर गंधर्वांचा तिच्या कलात्मकतेचा सर्वात जास्त प्रभाव होता. खरंच, तिने तिच्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांच्या शैलीचे आणि अधिक व्यापकपणे, किरण घराण्याशी जवळून पालन केले.

१९३०च्या दशकाच्या मध्यात, जेव्हा तिने तिच्या जवळच्या समुदायाबाहेर रेकॉर्डिंग आणि सादरीकरण करण्यास सुरुवात केली तेव्हा हंगलची एक कलावंत म्हणून प्रतिष्ठा वाढू लागली. १९४०च्या दशकाच्या सुरुवातीला, ऑल इंडिया रेडिओवरील तिच्या प्रसारणांमुळे आणि देशभरातील संगीत कार्यक्रमांच्या व्यस्त वेळापत्रकामुळे ती हिंदुस्तानी संगीतात एक प्रसिद्ध व्यक्ती बनली होती. सुरुवातीला तिने भजन किंवा हिंदू भक्तीगीते, हलक्याफुलक्या मराठी भाषेतील गाणी आणि ठुमरी म्हणून ओळखली जाणारी अर्धशास्त्रीय गाणी गायली तसेच ख्याल शास्त्रीय गाणी. तथापि, १९४०च्या दशकाच्या मध्यापर्यंत तिने जवळजवळ पूर्णपणे ख्यालकडे लक्ष केंद्रित केले होते भारतीय शास्त्रीय संगीतातील योगदानाबद्दल, हंगल यांना अनेक सन्मान मिळाले. १९७३ मध्ये तिला संगीत नाटक अकादमी पुरस्कार मिळाला. हंगल यांना पद्मभूषण (१९७१) आणि पद्मविभूषण (२००२) हे भारताचे दोन सर्वोच्च नागरी सन्मान देण्यात आले. त्यांचा मृत्यु२१ जुलै २००९ रोजी कर्नाटक राज्यातील हुबळी येथे झाला.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### झोप येण्यासाठी तुम्ही हा उपाय करत नाही ना?

प्रत्येक माणसाने सात ते आठ तास झोप घेणे अत्यंत आवश्यक आहे. सात ते आठ तासांपेक्षा कमी झोप झाल्यास त्याचा परिणाम आपल्या आरोग्यावर होत असतो. बहुतेक लोकांना रात्री चांगली झोप लागत नाही. त्यामुळे सकाळी उठल्यावर त्यांची चिडचिड होते. जे लोक नीट झोप घेत नाहीत, त्यांच्यासाठी ही खरोखरच अतिशय गंभीर समस्या आहे. कित्येकांना कधी कधी रात्री उशिरा झोप लागते. मग अपुऱ्या झोपेमुळे स्वाभाविकपणे सकाळी उठल्यावर सतत चिडचिड होत असते. त्यामुळे त्यांचे कोणत्याही कामात लक्ष लागत नाही. अशा वेळी अनेकजण झोप येण्यासाठी मेलाटोनिन घेतात. ही टॅबलेट चांगली झोप लागण्यासाठी, झोपेचे चक्र व्यवस्थित करण्याचे काम करते. मात्र, याचे जास्त प्रमाणातील सेवन शरीराचे नुकसान करु शकते मेलाटोनिन हा एक संप्रेरक आहे, जो झोपेचे मुख्य कार्य आणि जागे होण्याचे चक्र नियंत्रित करतो. जरी मेलाटोनिनची गोळी नियमितपणे झोपेमध्ये मदत करीत असली तरी त्या गोळीचा सावधगिरीने वापर केला पाहिजे. कारण- जास्त प्रमाणात सेवन केल्याने नकारात्मक परिणाम होऊ शकतात.



मेलाटोनिनच्या अत्यधिक वापरामुळे आरोग्यावर होणारे नकारात्मक परिणाम खालीलप्रमाणे :

**डोके दुखणे आणि हलकी डोकेदुखी :** अतिसेवनामुळे दोन्ही लक्षणे जाणवण्यासारखे संभाव्य दुष्परिणाम होतात.
वर्तणुकीतील बदल : वाढलेली चिंता, ताण हे सर्व जास्त डोस घेण्याचे नकारात्मक परिणाम आहेत.
**पोटाच्या समस्या :** ओटीपोटात दुखणे किंवा मळमळ होणे अपेक्षित आहे.
**झोपेच्या पद्धतींमध्ये बदल :** गंमत म्हणजे जास्त वेळ झोपण्याचा प्रयत्न करताना मेलाटोनिनचा उच्च डोस घेणे अजिबात योग्य ठरणार नाही.

डॉ. अग्रवाल यांनी सांगितले की, व्यक्तीचे वय, संवेदनशीलता यांच्या मदतीने सल्ल्यानुसार डोस घ्यावा लागतो. जास्तीत जास्त कार्यक्षमतेसाठी झोपण्याच्या ३० ते ६० मिनिटे आधी १-३ मिलिग्राम सेवन केले पाहिजे. काही वैद्यकीय परिस्थितींमध्ये ५-१० मि.ग्रॅ. वापराची आवश्यकता असू शकते; परंतु तरीही दीर्घ काळापर्यंत सेवन न करण्याचा सल्ला दिला जातो.

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

# खासदार सुनील तटकरे यांच्या मध्यस्थीने बाळगंगा धरण प्रकल्पग्रस्तांचे उपोषण स्थगित

## आमदार रविशेठ पाटील यांनी घेतली पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील यांची भेट

**पेण : प्रतिनिधी**

खासदार सुनिल तटकरे यांच्या मध्यस्थीने आज ६ व्या दिवशी अखेर बालगंगा धरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी प्रांत कार्यालयासमोरील बेमुदत उपोषण तूर्तास स्थगित केले. खासदार सुनील तटकरे यांच्या मध्यस्थीनंतर आणि मंत्रालयात संयुक्त बैठकीचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलकांनी आंदोलन तात्पुरते मागे घेतले.

पेण येथील उपोषणस्थळी भेट देऊन खासदार तटकरे यांनी आंदोलकांशी सविस्तर चर्चा केली. उच्च न्यायालयाचे आदेश, शासनाची भूमिका, पुनर्वसन कायदा, मोबदला तसेच सातबारा मूळ मालकांच्या नावे करण्याची मागणी या सर्व मुद्द्यांवर सखोल विचारविनिमय झाला. यावेळी त्यांनी पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून शुक्रवार ६ मार्च रोजी मंत्रालयात जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, सिडको अधिकारी आणि प्रकल्पग्रस्त शेतकरी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्याची विनंती केली.

दरम्यान आमदार रविशेठ पाटील यांनीही पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांची भेट घेतली. यावेळी मंत्री महोदयांनी संबंधित सर्व विषय तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे.प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मान्य न झाल्यास मी स्वतः शेतकऱ्यांसोबत उपोषणाला बसेन, असा इशारा खासदार तटकरे यांनी दिला. अखेर सहाव्या दिवशी संदीप पाटील, भरत कदम, शरद जाधव, वासुदेव पाटील आणि मधुकर हादगे यांना नारळ पाणी देत उपोषण सोडवण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी, प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# भाजप पदाधिकारी पोलीस निरीक्षकांच्या भेटीला



**माथेरान : बातमीदार**

माथेरान भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी यांनी नवीनच रुजू झालेल्या माथेरान पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक सरिता मुसळे यांची भेट घेत त्यांना शुभेच्छा दिल्या.

माथेरान पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सरिता मुसळे यांची भारतीय जनता पार्टी माथेरान शहरातील पदाधिकारी यांनी सदिच्छा भेट घेऊन माथेरान नगरीत त्यांचे स्वागत केले.तसेच यावेळी दीड महिन्यापूर्वी माथेरान शहरात घातलेल्या दरोड्याची योग्य दखल घेऊन आरोपीच्या मुसक्या आवळल्या त्यामुळे पीडित कुटुंबाला न्याय मिळणार आहे. त्यासाठी पोलीस प्रशासनाचे कौतुक करून संपूर्ण पोलीस टीमचे अभिनंदन केले

यावेळी शहरातील विविध समस्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक सकारात्मक असून सदरच्या विषयांची सविस्तरपणे माहिती घेऊन निश्चित त्या सोडविण्यात येतील असे सरिता मुसळे यांनी सांगीतले याप्रसंगी माथेरान शहरउपनगराध्यक्ष तथा आरोग्य सभापती संतोष शेलार,भाजपा शहर अध्यक्ष तथा नगरसेवक प्रवीण सकपाळमाजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी,चंद्रकांत जाधव,माजी नगरसेवक प्रदीप घावरे,राकेश चौधरी,उप शहर अध्यक्ष किरण चौधरी,भाजपा सरचिटणीस तथा व्यापारी फेडरेशनचे अध्यक्ष राजेश चौधरी,उद्योजक शैलेश चाफेरकर तसेच पोलीस उपनिरीक्षक गणेश गिरी,पोलीस शिपाई दामोदर खतेले आदी उपस्थित होते.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर अपघातात दोन जण जखमी

**खोपोली :** जळणाऱ्या ट्रकचा अचानक भडका उडाल्याने ट्रेलर चालकाने घाबरून लेन बदलल्याने कार आणि टेम्पोला धडकून अपघाताची घटना खालापूर हद्दीत माडप गावानजीक घडली. अपघातात दत्तात्रय तुकाराम ताटे वय ४८ आणि तुकाराम दादाराम थोरात रा .मोहोळ सोलापूर जखमी झाले आहेत. रविवार एक मार्च रोजी रात्री दोन वाजण्याच्या सुमारास मुंबईच्या दिशेने जात असताना माडप गावाच्या हद्दीत ट्रकला आग लागली होती. पेट घेतलेल्या ट्रकच्या जवळून जात असताना अचानक आगीचा भडका उडाल्याने टेलर चालकाने लेन बदलली. त्याच दरम्यान दुसरा लेन मध्ये पुढे असलेल्या कारला ट्रेलरची धडक बसली. त्याच दरम्यान पाठीमागून वेगात असलेला टेम्पो ट्रेलरवर आदळला. अपघातानंतर ट्रेलर चालक पळून गेला असून अज्ञात ट्रेलर चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## खोपोलीत मुलीला फूस लावून पळवले

**खोपोली :** कचरा टाकण्यासाठी गेलेली अल्पवयीन मुलगी घरी परत न आल्याने तिचे अपहरण झाल्याची तक्रार मुलीच्या आईने खोपोली पोलीस ठाण्यात दिली आहे. पिडित मुलगी इम्पेरिअल हाईट्स डी.पी.रोड लौजी खोपोली येथे राहते रविवारी संध्याकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास घरातून खाली कचरा टाकण्याकरीता गेली ती परत आली नाही. ती अल्पवयीन असल्याचे माहित असुन देखील कोणीतरी फुस लावुन पळवुन नेल्याची तक्रार मुलीच्या आईने दिली आहे. याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-मोहो, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| १११/४/ब | ०-१६-०० | ३.२८ | विजयकुमार रामचंद्र सुरशेटवार |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. ०४/०३/२०२६.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे वांगणी तर्फे वाजे,** तहसिल, पनवेल, जिल्हा - रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे वांगणी तर्फे वाजे,** तहसिल, पनवेल, जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १२९/अ | १ | ०-१८-०० | ०-००-०० | ०-१८-०० | ४.१५ |
| १२९/ब | १ | ०-१७-२० | ०-००-८० | ०-१८-०० | ३.९६ |
| १२९/क | १ | ०-१९-०० | ०-००-०० | ०-१९-०० | ४.३८ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **७ दिवसाचे** आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०४/०३/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९



**वाहन विक्री जाहिरात**
**(निविदा सूचना)**
**कोणार्क गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पनवेल**

सदर संस्थेच्या मालकीचे खालील वाहन जाहीर निविदेद्वारे विक्री करावयाचे आहे.

| तपशील | माहिती |
|---|---|
| वाहन प्रकार | Force Traveller T1 Bus (21 Seater) |
| नोंदणी क्रमांक | MH46CL2474 |
| उत्पादन वर्ष | ऑक्टोबर २०२३ |
| इंधन | Diesel (BS-VI) |
| स्थिती | Running Condition |

इच्छुक खरेदीदारांनी वाहन पाहण्यासाठी व निविदा अर्ज मिळविण्यासाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा.
संपर्क: ७४००४०६३७३ (सचिव) / ८२ ८६११८४३६ (अध्यक्ष)
बंद लिफाफा निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख: १३/०३/२०२६
**कोणार्क गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सर्वे नं. २६/५, चिंध्रण, तळोजा, पनवेल- ४१० २०८**
टीप : सर्वाधिक बोली स्वीकारण्याचा / नाकारण्याचा अधिकार समितीस राखीव आहे.

**सही/-**
**अध्यक्ष,**
**(बाबुराव कृ. कदम)**
**कोणार्क गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. चिंध्रण, पनवेल.**



## TENDER NOTICE

Kitchen Room, kitchen material & food Material room with Toilet bathroom

Playgroup Classroom & seven Digital Classroom

Breaking Old Plaster Inside & Outside, New Plaster Inside & Outside, All Colouring Work inside & outside, Door Frame & Doors, Window & Window Frames Sliding, Still Grills, Reparing All Electrical Work & Electric Equipments Safety Doors, All Furniture Work Repair & New, Steel Work, All Interior Decorate Work, Plumbig Work, Kitchen Platform work with all materials

Approximately 50 Lakh

Submit-7 Days

**Address -** Shree Ganesh Vidyamandir & Jr. College Chembur, Mumbai

DNC Public School Gopalwadi, Osmanabad After The Work The Statement Should Be Submited

**सही/-** **कार्यकारी विश्वस्त** | **सही/-** **विश्वस्त**
**श्री गणेश एज्युकेशन ट्रस्ट**



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**
**शहर अभियंता विभाग**
**फेर ई- निविदा सुचना**

**आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय** (Central Government / State Government/ Government under taking) **विभागात खालील कामासाठी नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ शतमान पध्दतीनुसार फेर ई-निविदा** (२nd Call) **मागवित आहेत.**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. ( Without GST) |
|---|---|---|---|
| १. | PMC/CE/२५६/२०२५-२६ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती क, धाकटा खांदा गावातील रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे व पूर्वनिर्मित पावसाळी गटार (Precast Storm Water Drain) बांधणे. (२nd Call) | ७,६०,९०,५४१/- |

या कामाच्या ई- निविदे बाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ०६/०३/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
अतिरिक्त आयुक्त- I
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र. ४९/५५/२०२६**
**दिनांक :- ४/०३/२०२६**



**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं.: ०२२-२७४५२२३३
Email: panvelcorporation.maharashtra.gov.in

**कार्यालय जा. क्र. पमपा/मालमत्ता कर/ २५५८ /२०२६** **दिनांक : ०४/०३/२०२६**

**जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना जाहिर सूचना देण्यात येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांर्तगत सर्व मालमत्तांना मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

सन २०२५ - २०२६ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रासाठी सर्व मालमत्ता धारकांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम ५५ अन्वये प्रत्यक्ष व ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कराची देयके बजावणेत आलेली आहेत.

तथापि, ज्या मालमत्ता धारकांना अद्यापपर्यंत मालमत्ता कराची देयके प्राप्त झालेली नाहीत, त्या मालमत्ता धारकांनी panvelmc.org किंवा KARMITRA PMC -APP वर नोंदणी करुन ऑनलाईन पध्दतीने मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घ्यावीत. तसेच, ज्या मालमत्ता धारकांना ऑनलाईन पध्दतीचा वापर करुन मालमत्ता कराची देयके प्राप्त करुन घेणे शक्य नाही अशा मालमत्ता धारकांनी मुख्यालयात किंवा संबंधित प्रभाग कार्यालयामधून देयके उपलब्ध करुन घ्यावीत.

पनवेल महानगरपालिकेच्या विकास कामासाठी व नागरी सुविधा सुरळीत पुरविणेकामी कर वसुली अत्यंत आवश्यक आहे. ज्या मालमत्ता कर धारकांचा सन २०२५-२६ पर्यंतचा मालमत्ता कर थकीत आहे त्यांनी तात्काळ संबधित रक्कम महानगरपालिकेच्या कर संकलन केंद्रात किंवा ऑनलाईन पद्धतीने भरावी. मालमत्ता कराचा ऑनलाईन पध्दतीने भरणा केल्यास अतिरिक्त २% सुट देण्यात येते.

सर्व थकबाकीदारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, मालमत्ता कराच्या थकीत रकमेचा संपूर्ण भरणा **दिनांक १०/०३/२०२६** अखेर करावा, असे न केल्यास थकबाकीदारांची नावे स्थानिक वृत्तपत्रांत जाहिररित्या प्रसिद्ध करण्यात येईल व यामुळे होणाऱ्या बदनामीस महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. नागरिकांच्या सुविधेसाठी मालमत्ता कराचा भरणा करणेकामी **माहे मार्च २०२६ मधील सर्व शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टिच्या दिवशी कार्यालय पूर्णवेळ सुरू असेल.**

तसेच याउपरही थकीत रकमेचा भरणा न केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८,१२९ कराधान नियम प्रकरण ८ मधील नियम ३०,४१,४२,४३,५२,५४ अन्वये दंड, जप्ती, अटकावणी व इतर अनुषंगिक कायदेशीर कारवाई प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्यामुळे मालमत्ता धारकांनी थकीत मालमत्ता कर तात्काळ भरून पनवेल महानगरपालिकेच्या विकास कामांस हातभार लावावा ही नम्र विनंती

**सही/-**
**उपायुक्त (कर)**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र.:-पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र. ४९/५५/२०२६**
**दिनांक :- ४/०३/२०२६**



**खालापूर नगरपंचायत**
स्थापना-२६ जून २०१५
मु.पो.ता. खालापूर, जि. रायगड
दुरध्वनीक्र, ०२१९२-२७५०१५ पिननं. ४१०२०२
ई-मेल आयडी- cokmckhalapur@gmail.com

**निविदा सूचना**

मुख्याधिकारी खालापूर नगरपंचायत यांच्या तर्फे खालापूर नगरपंचायत मधील मालमत्ता डेटा एन्ट्री आय. डब्ल्यू. बी. पी. संगणक प्रणाली मध्ये करणे या कामासाठी दि. ०४/०३/२०२६ ते ११/०३/२०२६ रोजी पर्यंत ऑफलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक निविदा धारकांनी शेवटच्या तारखेच्या आत कार्यालयात दरपत्रक सादर करावी व अधिक माहिती साठी संबधित विभागाशी संपर्क साधावा.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
खालापूर,नगरपंचायत

**दिनांक : २७/०२/२०२६**
**नपंखा/प्रमाणपत्र/९११/२०२५-२६**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Vendors/Contractors of MSETCL for following SRM E-tender,

| RFx No. | E-Enquiry No. | Particulars | Estimated Cost | EMD | Tender fees |
|---|---|---|---|---|---|
| 7000039040 | EE/400kV/ RS(O&M)/DN/ KHR/Ten3/ 2025-26 | AMC for various type of bay maintenance work under 400kV RS(O&M) Div, Kharghar at 400kV RS, Kharghar. | Rs. 29 Lac (incl. GST) | Rs. 29,983.20/- (incl. GST | Rs. 590/- (incl. GST) |

**Sale period:** 01.03.2026 to 15.03.2026, **Last Date of Submission:** 15.03.2026 up to 23:59 Hrs,
**Date of opening (Tech. bid):** 16.03.2026 at 10:30 Hrs (if possible).
**Contact person:** Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar. (Contact No-9167006557).
For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV RS O&M Dn., Kharghar**

# मोहोपाडा शहरात वाहतूक कोंडी

## अवजड वाहनांच्या रहदारीमुळे अपघातांना निमंत्रण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मुख्य बाजारपेठेचे ठिकाण असलेल्या मोहोपाडा शहरात वाढत असलेली वसाहत, महाविद्यालय, कार्यालये तसेच कारखानदारी यामुळे परिसरात घरोघरी दुचाकी व चारचाकी वाहनांमध्येही वाढ झाली आहे. बाजारपेठेचा केंद्रबिंदू असलेल्या मोहोपाडा शहरात सायंकाळी नेहमीच वाहतूक कोंडी होते.

शिवाय दांड-रसायनी रस्त्यावरून अवजड वाहनांची रहदारी वाढल्याने अपघाताच्या समस्या वाढत आहेत. यावेळी रसायनी तील वाहतूक पोलिसांना तारेवरची कसरत करावी लागते. नुकताच रसायनी पोलीस ठाण्याचा चार्ज पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी स्विकारला आहे. मोहोपाड्यातील वाहतूक कोंडीवर अभिजित भुजबळ यांनी मार्ग काढण्याची गरज असल्याचे नागरिकांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.



मोहोपाडा बाजारात आसपासच्या परिसरातील नागरिक बाजारहाट करण्यासाठी आले की वाहन कोठे उभे करावे, हा प्रश्न निर्माण होतो. वाहनचालक मध्येच गाडी उभी करून खरेदी अथवा इतर कामासाठी बाजारात जातात. अशावेळी एखादे वाहन आले तर त्या थांबलेल्या वाहनामुळे वाहतूक कोंडी होऊन नागरिक व प्रवाशांना याचा त्रास सहन करावा लागतो.

यावेळी रसायनी वाहतूक शाखेचे पिएसआय नामदेव डोके, वाहतूक पोलीस सुरेश पाटील, रामप्रभू तिडके, निलेश गडाख यांना वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अथक परिश्रम घ्यावे लागत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

मोहोपाडा पंचशिलनगरजवळ मैदानाच्या बाजूला वाहनतळ आहे. तरीही वाहनचालक त्याचा वापर न करता वाहन रस्त्याकडेला उभे करून वाहतूककोंडी करत आहेत. काहीवेळा दुकानासमोरही वाहने दुचाकीस्वार लावतात त्याला या दुचाकीस्वारांना पर्याय नसल्यामुळेच ही वाहने कोठेही लावली जातात. त्यामुळे दुकानात ग्राहकाला जाणे ही कठीण होते. वाहनचालक, ग्राहक व नागरिकांना होणारा त्रास प्रशासनाने लक्षात घेऊन मोहोपाडा शहरात सुसज्ज वाहन पार्किंग स्थळ तयार करून वाहनचालकांचे लक्ष वेधणारे सूचना फलक लावावेत शिवाय दांड-रसायनी रस्त्यावरील अवजड वाहनांच्या वाहतुकीला नो एन्ट्री वेळ राखून ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# कळंबोलीत अतिक्रमणविरोधी विभागाची तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या काही दिवसांपासून महापालिकेच्यावतीने पालिका हद्दीतील अनधिकृत झोपड्या, शेड, स्टॉल्सवर आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठी तोडक कारवाई करण्यात येत आहेत.

नुकतेच कळंबोली प्रभाग समिती ब मधील सेंट जोसेफ शाळेजवळ बर्‍याच दिवसापासून उभ्या असणार्‍या वाहनांवर नियमानुसार नोटीस लावून सदरील वाहनांवर कारवाई करून दोन वाहने जप्त करण्यात आले. त्यामुळे सेंट जोसेफ कळंबोली येथे होणारी ट्राफिक कमी होण्यास मदत होत आहे.

याचप्रमाणे सेंट जोसेफ शाळेजवळ अनधिकृतपणे वाहनांमधून फळ विकणाऱ्या



वाहनांवर कारवाई करून तीन वाहने जप्त करण्यात आली आहेत. कळंबोलीमधील केएलई महाविद्यालय समोरील मुख्य रस्त्यावरील अनधिकृतपणे खाद्यपदार्थ विक्री करणारे व वारंवार सूचना देऊनही न हटणाऱ्या स्टॉल धारकांवर अतिक्रमण पथकामार्फत तोडक कारवाई करण्यात आली.

कळंबोली प्रभाग समितीचे सहायक आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. यावेळी प्रभारी अधिक्षक राजेश डोंगरे, अतिक्रमण पथकातील सुपरवायझर, कर्मचारी, एमएसएफचे सुरक्षारक्षक उपस्थित होते.

## अभीष्टचिंतन



**पनवेल : ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स् प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक धनंजय करतुरी यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या.**

# पनवेलमध्ये धुलिवंदनचा उत्साह; तरुणाईकडून जल्लोष







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात धुलीवंदनाचा उत्साह मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. शहरातील मिडल क्लास हाऊसिंग सोसायटीच्या मैदानावर धुळवडनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात तरुण-तरुणींची मोठ्या संख्येने उपस्थिती पाहायला मिळाली.

मैदानावर डीजेच्या तालावर थिरकणारे तरुण-तरुणी, रंगांची उधळण आणि उत्साही वातावरणामुळे संपूर्ण परिसरात सणाचा आनंद पसरला होता. उपस्थित नागरिकांनी एकमेकांना रंग लावत आणि संगीताच्या तालावर नृत्य करत धुलीवंदनाचा मनमुराद आनंद घेतला. मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून सहभाग घेतला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाचा उत्साह आणखी वाढला.

यावेळी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृह नेते परेश ठाकूर तसेच मिडल क्लास हाऊसिंग सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष तथा नगरसेवक सुमित झुंजारराव यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उत्साह, जल्लोष आणि रंगांची उधळण यामुळे पनवेलमध्ये धुलीवंदनाचा हा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला.

# चांभार्ली ग्रामपंचायत सामाजिकदृष्ट्या संरक्षित गाव थीममध्ये राज्यातून प्रथम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील ग्रुप ग्रामपंचायत चांभार्ली यांनी केंद्र शासनाच्या पंचायत विकास निर्देशांक अंतर्गत ९ संकल्पनांपैकी सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव या थीममध्ये राज्यात सर्वाधिक गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या उल्लेखनीय यशाची दखल घेत पंचायतराज मंत्रालय यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पंचायत पुरस्कारासाठी महाराष्ट्र शासनाकडून ग्रामपंचायतीचे अधिकृत नामांकन करण्यात आले आहे.



राज्य शासनाच्या समितीमार्फत केंद्राकडे प्रस्ताव सादर करताना ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, यशदाचे उपमहासंचालक व नोडल अधिकारी डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, राज्य समन्वयक श्रीधर कुलकर्णी व सहाय्यक समन्वयक अमीर शेख यांनी मोलाचे सहकार्य केले.

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप कराड तसेच विस्तार अधिकारी विनोद चांदोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी यशस्वी झाली.

सरपंच प्रतिप पाटील व ग्रामपंचायत अधिकारी सीमा राठोड यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत सदस्य, सर्व शासकीय कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या सहकार्याने सामाजिक दृष्ट्या सुरक्षित गाव संकल्पनेतील सर्व उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी प्रभावी कामकाज करण्यात आले. ग्रामस्थांच्या उन्नतीसाठी राबविण्यात आलेल्या उपक्रमांमुळे राज्य शासनाने ही दखल घेतली असून, या यशाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व आनंद व्यक्त केला आहे.

# एमएनएम विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान सप्ताह साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या एमएनएम विद्यालयात डॉ. सी. व्ही. रामन यांचे विज्ञानातील महत्त्वपूर्ण योगदानाच्या स्मरणार्थ २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहवर्धक वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी दीपप्रज्वलन केले तसेच डॉ. सी व्ही रामन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

शाळेतील विद्यार्थ्यांनी विज्ञान सप्ताह निमित्त वैज्ञानिक दृष्टिकोन, निरीक्षण क्षमता, आकलन शक्ती, निर्णय क्षमता, तार्किक वृत्ती यांच्या संवर्धनाकरिता विविध वैज्ञानिक उपक्रमांचे आयोजन





करण्यात आले . विज्ञान विषयक प्रश्नमंजुषा, विज्ञान वार्ता, नोबेल पारितोषिक विजेते भारतीय वैज्ञानिकांचे कार्य बद्दल माहितीपट दाखवण्यात आला. विज्ञान दिनानिमित्त सहाय्यक शिक्षक अविनाश कजबजे यांनी विज्ञान विषयाचे महत्त्व स्पष्ट करत, विज्ञानाचा दैनंदिन जीवनातील उपयोग, तसेच वैज्ञानिकांकडून विद्यार्थ्यांनी कोणत्या गुणांचा अवलंब करावा असे नमूद केले.

अंधश्रद्धा निर्मूलन, वैज्ञानिक विचारसरणी आधारित विविध प्रयोगांचे सादरीकरण विज्ञान शिक्षक परेश पावस्कर, रतीका ठाकूर, शालिनी कांबळे यांनी केले. तसेच भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, यामधील विविध तत्वे तसेच सिद्धांत यांचे सुलभ स्पष्टीकरण छोट्या छोट्या कृती व प्रयोगातून शिक्षण विज्ञान शिक्षिका, दिपाली कोल्हे, वंदना जाधव, कोमल ठाकूर, यांनी केले.

# उरण तालुक्यात पारंपरिक होळी आणि धुळवड उत्साहात

**उरण : प्रतिनिधी**

भारत देशात सर्वत्र साजरा होणारा होळीचा सण म्हणजे एक लोकोत्सवच आहे. महाराष्ट्रात विशेषतः ग्रामीण भागात होळीकोत्सव साजरा करण्याची मोठी परंपरा आहे. या प्रदीर्घ परंपरेला होळी शिमगा असे म्हटले जाते. उरण तालुक्यात यंदाचा होलिकोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

होळीचे आजचे स्वरूप बदलले असले, तरी येथील काही जुन्या परंपरा अजून कायम टिकून आहेत. तालुक्यातील उरण शहरासह चिरनेर कळंबुसरे, कोप्रोली, मोठीजुई, आवरे, वशेणी, पुनाडे, गोवठणे, पाले, नागाव, केगाव, दिघोडे, विंधणे, वेश्वी, जासई, धुतुम, पागोटे, नवघर, भेंडखळ, बोकडविरा, फुंडे डोंगरी, पाणजे, नविनशेवा, चाणजे, सोनारी, करळ मोठेभोम यासह तालुक्यातील असंख्य गावागावात व परिसरातील आदिवासी वाडी वस्तीत होळी सणाच्या दिवशी सायंकाळी महिला तरुणाईसह नागरिक होळीची पूजा करण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

उरण तालुक्यात होळी उत्सवाची





पुर्वपार जुनी परंपरा कायम असतांना, या परंपरे नुसार शुद्ध नववीपासून पौर्णिमेपर्यंत हा होळीचा सण साजरा केला जातो. यात शुद्ध नवमीला होळीचे मुख्य पुजारी सावर जातीच्या झाडची एक लहान फांदी आणून, ते होळीच्या खांबावर म्हणजे होळीच्या मैदानात संध्याकाळी उभी करून त्या फांदीची हळद कुंकूने पूजा करून त्यावर पेंढा टाकून, बोंबा मारून फांदी पेटवून देण्याची प्रथा आजही कायम टिकून आहे. शुद्ध नवमीपासून ते पौर्णिमेपर्यंत दर दिवस संध्याकाळी हा उपक्रम केला जातो. या सावडीच्या फांदीला हेलकूट संबोधिले जाते. त्याचप्रमाणे सर्वच गावातील होळीचे मुख्य पुजारी होळीची सजावट करून होळी उभारण्याचे काम आजतागायत परंपरे नुसार करीत आहेत.

संध्याकाळी या होळीदेवतेची येथील महिला यथासांग पूजा करतात. होळी देवतेला पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जातो. त्यानंतर रात्री बारा वाजेपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांबरोबर नृत्याचे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले जातात. रात्री बारा वाजता होळी देवतेची आरती करून, तीन प्रदक्षिणा घालून, लाकडे व पेंढा टाकून बोम ठोकून, होळी पेटविण्याचा विधी केला जात आहे. आजही गावागावात होळीच्या मुख्य पुजाऱ्याचा पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करण्याचा पहिला मान आहे. बदलत्या काळानुसार होळीच्या सणाचे स्वरूप बदलत असले, तरी येथील होळीच्या ज्या विधी, परंपरा आहेत. त्या जपणूक केल्या जात आहेत.

मुख्य म्हणजे होळीच्या खांबाची जागाही अजून बदलली गेलेली नाही. हे विशेष आहे. दरम्यान, धुळवडीच्या दिवशी होळीच्या पेटविलेल्या अग्नीवर अंघोळीचे पाणी तापवून पाण्याने स्नान करण्याची प्रथा आजही उरण तालुक्यात दिसून येत आहे. उठू उठू हौलूबाय दिवा लावला. कोय कोय कोबेटी उंदरांनी नेली लंगोटी, शतक सिताराम पोरांचा काय काम, आयना का बायना घेतल्याशिवाय जायना, रात्री होळीची पालखी अशा सोंगांची पूर्वापारची प्रथा फारशी दिसून येत नसली तरी होळी सणातील पा रंपारिकता आजही जपली जाते. होळीच्या गाण्यांचे गायन त्याचबरोबर पर्यावरणाची गंभीर समस्येचा गांभीर्यपूर्वक विचार करून पूर्वी सारखी वृक्षतोड नाकारता सुकी लाकडे आणि शेतातील पेंढा आणि पालापाचोळा याचा वापर करून रात्री १२ वाजताच्या आरतीनंतर होळीला अग्नी देण्यात आला.

# पनवेल येथे मकबूल दुआ पुस्तकाचे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल काझी यांच्या हस्ते मकबूल दुआ या पुस्तकाचे प्रकाशन समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी हलिमाबाई झुलेवाली ट्रस्टचे अध्यक्ष हानिफ काची यांच्यासह झुबेर पिट्टू, जवाद काझी, माझ मुल्ला, असिफ करेल, निसार पटेल, अझीम मुल्ला, नूर पटेल, यासर आणि साजिद पटेल यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी इक्बाल काझी यांनी आपल्या भाषणात हनीफ कच्छी यांच्या सामाजिक व राष्ट्रहिताच्या कार्याचे कौतुक केले. ते देश आणि समाजाच्या प्रगतीसाठी तसेच तरुण पिढीला चांगला व सद्गुणी नागरिक बनवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. पुस्तके आणि दुआ यांच्या माध्यमातून समाजाला योग्य मार्गावर नेण्याचा हा स्तुत्य उपक्रम असल्याचेही त्यांनी नमूद केले. समारंभ आनंददायी वातावरणात संपन्न झाला असून उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत केले.



# सेमी फायनलसाठी टीम इंडिया सज्ज

## ■ संघात फेरबदल करण्यासंदर्भात व्यवस्थापनाचे विचारमंथन

**मुंबई : प्रतिनिधी**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघ उपांत्य फेरीत पोहचला असला तरी सलामीवीर फलंदाज अभिषेक शर्माच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. स्पर्धेपूर्वी आयसीसी क्रमवारीत टी-२० फॉरमॅटमध्ये अव्वल फलंदाज असलेला अभिषेक या स्पर्धेत मात्र अपेक्षित कामगिरी करू शकलेला नाही. त्यामुळे इंग्लंडविरुद्ध होणाऱ्या उपांत्य सामन्यापूर्वी त्याला संघातून वगळावे का यावर चर्चा सुरू झाली आहे.

अभिषेक शर्माने २०२४मध्ये झिम्बाब्वे दौऱ्यात भारताकडून टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. पहिल्या सामन्यात तो शून्यावर बाद झाला होता, मात्र पुढच्याच सामन्यात त्याने शानदार शतक झळकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. यानंतर त्याने मागे वळून पाहिले नाही. आक्रमक फलंदाजीच्या जोरावर त्याने भारतीय संघात सलामीवीर म्हणून आपली जागा पक्की केली.



अभिषेक शर्मा



रिंकु सिंह

२०२५ वर्ष अभिषेकसाठी अत्यंत यशस्वी ठरले. आशिया कपमध्ये त्याने सात सामन्यांत ३१४ धावा करत स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला. सरासरी ४४.८६ आणि स्ट्राइक रेट २००च्या आसपास होता. सातत्यपूर्ण कामगिरीमुळे त्याला 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट' पुरस्कारही मिळाला. न्यूझीलंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतही त्याने दमदार कामगिरी केली. पाच डावांत त्याच्या १८२ धावा, ४५.५० सरासरी आणि तब्बल २४९.३२ स्ट्राइक रेट होता.

टी-२० विश्वचषक सुरू झाल्यानंतर अभिषेकचा फॉर्म अचानक घसरला. सराव सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध १८ चेंडूत २४ धावा करून तो बाद झाला. मुख्य स्पर्धेत अमेरिकेविरुद्ध पहिल्याच चेंडूवर तो बाद झाला. पाकिस्तानविरुद्धही तो चार चेंडूत शून्यावर बाद झाला. नेदरलँड्सविरुद्धही त्याला मोठी खेळी करता आली नाही. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या सामन्यात त्याने १२ चेंडूत १५ धावा केल्या.

झिम्बाब्वे विरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यात मात्र अभिषेकने ३० चेंडूत ५५ धावांची दमदार खेळी केली. चार चौकार आणि चार षटकारांसह त्याने भारताला महत्त्वाचा विजय मिळवून दिला. या खेळीनंतर त्याचा आत्मविश्वास परत येईल अशी अपेक्षा होती, मात्र वेस्ट इंडिजविरुद्धच्या महत्त्वाच्या सामन्यात तो पुन्हा अपयशी ठरला. त्याने दोन सोपे झेल सोडले आणि फलंदाजीत ११ चेंडूत फक्त १० धावा केल्या.

आता मोठा प्रश्न असा आहे की इंग्लंडविरुद्धच्या उपांत्य सामन्यात अभिषेकला संघातून वगळावे का? मोठ्या स्पर्धेच्या शेवटच्या टप्प्यात संघात मोठे बदल करणे सहसा टाळले जाते. वेस्ट इंडिजविरुद्ध शानदार नाबाद ९७ धावा करणाऱ्या संजू सॅमसनला सलामीला पाठवण्याचा पर्याय संघाकडे आहे. त्याच्यासोबत इशान किशन फलंदाजीला येऊ शकतो.

रिंकू सिंगलाही संघात स्थान देण्याचा पर्याय आहे, मात्र या स्पर्धेत त्याने विशेष कामगिरी केलेली नाही. दुसरीकडे हार्दिक पांड्या आणि शिवम दुबे यांसारखे फिनिशर चांगल्या फॉर्ममध्ये आहेत.

उपांत्य सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होणार आहे. ही खेळपट्टी फलंदाजांना अनुकूल मानली जाते. जर अभिषेक शर्मा लयीत आला, तर इंग्लंडच्या गोलंदाजांना तो घाम फोडू शकतो. त्यामुळे फॉर्म नसलेल्या खेळाडूला संधी द्यायची की निर्णायक सामन्यात संघात बदल करायचा हा मोठा निर्णय भारतीय संघ व्यवस्थापनासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

# महाडमध्ये मॅरेथॉनला प्रतिसाद



**महाड : प्रतिनिधी**

बिर्ला ओपस कंपनी समूहाकडून महाड येथील भिलारे मैदानात हाफ मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला महाडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सुमारे दोन हजारहून अधिक धावपटूंनी स्पर्धेत सहभाग नोंदवला.

२१ किलोमीटर अंतर असलेल्या गटाला मॅरेथॉन ॲम्बेसिडर मिलिंद सोमण यांनी हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर इतर गटांना टप्प्याटप्प्याने सोडण्यात आले. आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी या मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

स्पर्धेस महाडचे नगराध्यक्ष सुनील कविस्कर, उपनगराध्यक्ष संदीप जाधव, पोलीस निरीक्षक संदीप भोसले, कंपनीचे सीओओ अजितकुमार व्ही.पी., आनंद सिंग, अरुण शिर्के, महेंद्रसिंग शेखावत आदी उपस्थित होते. या वेळी फिटनेस आयकॉन मिलिंद सोमण, कॉम्रेड मॅरेथॉन रनर सतीश गुजरात आणि अल्ट्रा मॅरेथॉन रनर सोफिया सुफी यांची विशेष उपस्थिती आकर्षणाचा विषय ठरली.

महिलांसाठी पाच किमी स्पर्धेत १२ ते २५ वर्षे वयोगटात पूजा सावंत, भूमी मात्रे व केतकी पार्टी, २६ ते ४० वयोगटात स्वाती गुजर, सुप्रिया जामखेंडे, वैष्णवी ठोसर, ४१च्या पुढील वयोगटात माधुरी शिवदे, रूपाली पांगर आणि अनिता जाधव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला.

### २२६० धावपटूंचा स्पर्धेत सहभाग

पुरुषांमध्ये पाच किमी स्पर्धेत १२ ते २५ वयोगटांमध्ये संदीप जोशी, हेमंत निषाद, सोमनाथ चव्हाण, २६ ते ४० वयोगटात संदीप कुमार, प्रथमेश बाईत, शुभम मोरे, ४१ पुढील वयोगटातील श्रीनिवास पांडे, अरविंद नलावडे व नाथाभाऊ गिरनेकर यशसवी ठरले.

महिलांमध्ये १६ ते २५ वयोगटात संतोषी नराले, श्रावणी लिंबे, रेश्मा बंधारे, २६ ते ३५ वयोगटात प्रिया शिंदे, स्वाती चौधरी, ऐश्वर्या बोरतवार, ३६ ते ४५ वयोगटातील मिनाज नदाफ, विनाय गुजर, शुभांगी निकम, ४६ ते ५५ वयोगटात वैशाली गायकवाड, नंदा शिंदे, सायली निकम आणि ५६च्या पुढील वयोगटात एकमेव शिल्पा भन्साळी यांनी विजय मिळवला.

पुरुषांमध्ये २६ ते ३५ वयोगटात अमोल ताम्हणकर, श्रीकांत इंगळे, महेश मोरे, ३६ ते २५ वयोगटात योगेश जाधव, रघुनाथ हंबीर, अमित कदम, ४६ ते ५५ वयोगटात जयनाथ शिंदे, विठ्ठल आरगडे, अहमद अली शेख, ५६ ते ६५ वयोगटात घनश्याम पद्मगिरी, संजय पाटील, अभिजित स्वामी अणि ६६वरील वयोगटातील बजरंग चव्हाण व पुरुषोत्तम गुप्ता यांनी विजय प्राप्त केला.

हाफ मॅरेथॉनच्या २१ किमी स्पर्धेत महिलांमध्ये १८ ते २५ वयोगटात साक्षी पवार, अर्पिता शेट्टी, सुश्मिता म्हात्रे, २६ ते ३५ वर्ष वयोगटात उर्मिला बाणे, स्नेहा काळे, ३६ ते ४५ वयोगटात स्मिता शिंदे, दिपाली राहते, सोफिया सुफी, ४६ ते ५५ वयोगटात अनिता पाटील, संध्या कामात, वैशाली इंगवले, ५६ ते ६५ वर्ष वयोगटात संगीता उबाळे, पूर्ती खोतरे, ६६वरील वयोगटात तुलात कामत यांनी विजय मिळवला.

पुरुषांमध्य १८ ते २५ वयोगटात स्वप्निल कोचाल, हरिराम मौर्य, ओंकार चांदीवाडे, २६ ते ३५ वयोगटात रामू पारधी, अजित किंजळे, सुजन कुमार, ३६ ते २५ वयोगटात सुभाष पवार, सचिन निकम, संकल्प जैन, ४६ ते ५५ गटात रवींद्र जगदाळे, शिवानंद शेट्टी, अनंत शंकर, ५६ ते ६५ वयोगटात उदय बोभाटे, केशव मोते, नगराजन रामकृष्णन आणि ६६वरील वयोगटात जयकुमार गोसावी, हेमंत भागवत व अर्जुन पंडित यांनी विजय साकारला.

# क्लासिक राज्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत रायगडचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबईच्या वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात महाराष्ट्र राज्य सीनियर आणि मास्टर पॉवरलिफ्टिंग क्लासिक स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंना यश मिळविले.

स्पर्धेच्या उद्घाटनाला व्यायाम क्षेत्रातील मधुकर तळवलकर, पपी उर्फ हेमचंद्र पाटील, महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंगचे अध्यक्ष अर्जुन पुरस्कार विजेते संजीवन भास्करन, क्रिकेट प्रशिक्षक गोपाळ कोळी, निवृत्त एअरफोर्स अधिकारी सदानंद चिखले आदी उपस्थित होते.

स्पर्धेत रायगडातील खेळाडू अमृता भगत (पॉवर हाउस क्लब, खोपोली) हिने सीनियर ४७ किलो वजनी गटात सुवर्ण, महेश कृष्णा पाटीलने मास्टर्स-२च्या ६६ किलो वजनी गटात सुवर्ण, रमेश खरे (हनुमान व्यायामशाळा, पेण) मास्टर-४मध्ये रौप्य, संगीता पंगत (फिटनेस ऑन जिम, पनवेल) मास्टर-१मध्ये ८४ किलो वजनी गटात कांस्यपदक पटकाविले. गतिमंद मुलांच्या स्पर्धेत हनुमान व्यायामशाळेच्या यश सुनील पंगत याने ७४ किलो वजनी गटात सुवर्ण आणि जितेश पांडुरंग साजेकरने ५४ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावून रायगड जिल्ह्याचे नाव उज्वल केले.

खेळाडूंच्या या यशाबाबत आनंद व्यक्त करून पॉवर हाऊस क्लब खोपोलीचे प्रशिक्षक विक्रांत गायकवाड, फिटनेस ऑन जिमचे प्रशिक्षक प्रमोद पवार आणि हनुमान व्यायामशाळेचे प्रशिक्षक राजेश अंगद यांचेसुद्धा अभिनंदन करण्यात आले.

राज्य स्पर्धेत रायगड संघाचे व्यवस्थापक म्हणून संदीप पाटकर, प्रशिक्षक म्हणून रामचंद्र गावडे आणि सहाय्यक म्हणून सुभाष टेंबे यांनी जबाबदारी पूर्ण केली. या वेळी खेळाडूंना समस्त पाटकर बंधूंच्या वतीने रायगड जिल्ह्याचे टी-शर्ट वितरित करण्यात आले होते.

# स्मृती मानधना आयसीसी क्रमवारीत अव्वल

**दुबई** : आयसीसी क्रमवारीत भारतीय महिला संघाची उपकर्णधार स्मृती मानधना एकदिवसीय फलंदाजांमध्ये अव्वल स्थानावर विराजमान झाली आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या नुकत्याच संपलेल्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतील मानधनाच्या दमदार कामगिरीमुळे तिला आयसीसी रँकिंगमध्ये पुन्हा एकदा अव्वल स्थान मिळाले.

स्मृती मानधनाने दक्षिण आफ्रिकेच्या लॉरे वोल्वार्डला मागे टाकत ७९० गुणांसह अव्वल स्थान पटकावले आहे. वोल्वार्ड सध्या ७८२ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. बेथ मुनी तिसऱ्या स्थानावर, तर आपल्या शेवटच्या एकदिवसीय सामन्यात शतक झळकावणारी एलिसा हीली ७४४ गुणांसह चौथ्या स्थानावर राहिली.

# दिवाळे कोळीवाड्यात पारंपरिक वेशभूषेत क्रिकेट स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**




आधुनिकतेच्या लाटेत अनेक पारंपरिक चालीरीती लोप पावत असल्या तरी नवी मुंबईतील दिवाळे कोळीवाडा येथे परंपरा आणि उत्साह यांचा सुंदर संगम पहायला मिळाला. होळी सणानिमित्त भव्य ओव्हरआर्म लंगोटी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन येथे करण्यात आले होते. या आगळ्यावेगळ्या स्पर्धेने परिसरात सणासुदीचा उत्साह अधिकच दुणावला.

स्पर्धेत दिवाळे कोळीवाड्यातील तब्बल १३ संघांनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे सर्व खेळाडूंनी डोक्यावर लाल टोपी आणि कमरेला लंगोटी परिधान करून पारंपरिक कोळी वेशभूषेत सामने खेळले. त्यामुळे स्पर्धेला खऱ्या अर्थाने पारंपरिक रंगत प्राप्त झाली. आगरी-कोळी समाजाचा उत्सवप्रिय स्वभाव आणि आपल्या संस्कृतीबद्दलची जपणूक या स्पर्धेतून प्रकर्षाने दिसून आली. विशेष म्हणजे संपूर्ण ठाणे जिल्ह्यात लंगोटी घालून खेळली जाणारी ही एकमेव स्पर्धा असल्याने पंचक्रोशीतील क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.

मे. अक्षय डेव्हलपर्सचे सोमनाथ देवकर यांच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यंदाचे स्पर्धेचे १८वे वर्ष होते. होळीनिमित्त गावच्या मातीत रंगलेल्या मैदानावर खेळली गेलेली ही लंगोटी क्रिकेट स्पर्धा गावाच्या एकोप्याची, संस्कृतीच्या जतनाची अन् परंपरेच्या अभिमानाची साक्ष देणारी ठरली. विजेत्या संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.






# नियम मोडल्याने वाहतूक विभागाकडून एमएस धोनीला दंड

**रांची : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी पुन्हा एकदा चर्चेमध्ये आला आहे. यावेळी क्रिकेटमुळे नव्हे, तर वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे. रांची ट्रॅफिक पोलिसांनी ओव्हरस्पीडिंगमुळे धोनीवर दंडात्मक कारवाई केली आहे.



माहितीनुसार रांचीतील वाहतूक विभागाने धोनीच्या वाहनाचा वेग मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे सांगितले आहे. त्यानंतर मोटार वाहन कायद्याच्या कलम १८३ अंतर्गत त्याला एक हजार रुपयांचे ई-चलान पाठवण्यात आले आहे.

रांची शहरात बसवण्यात आलेल्या ऑटोमॅटिक ट्रॅफिक मॉनिटरिंग सिस्टीममुळे महेंद्रसिंह धोनीला दंड बसला आहे. ही घटना किरकोळ असली तरी धोनीशी संबंधित असल्यामुळे सोशल मीडियावर याची जोरदार चर्चा होत आहे.

काही दिवसांपूर्वी झारखंड राज्य गृहनिर्माण मंडळानेही धोनीला नोटीस पाठवली होती. रांचीतील हरमु रोडवरील निवासी भूखंडाचा गैरवापर केल्याच्या आरोपावरून ही नोटीस देण्यात आली होती. अधिकाऱ्यांच्या मते, हा भूखंड केवळ निवासी वापरासाठी देण्यात आला होता, मात्र त्या जागेचा व्यावसायिक वापर होत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. धोनी सध्या रांचीतील रिंग रोडवरील नवीन घरात राहत आहे.

दरम्यान, आयपीएल २०२६ हंगामाची तयारी सुरू झाली आहे. धोनीने चेन्नई सुपर किंग्स संघाच्या सराव शिबिरात सहभागी होत प्रशिक्षणाला सुरुवात केली आहे. या सराव सत्रात संघाचा कर्णधार ऋतुराज गायकवाड आणि इतर भारतीय खेळाडूही उपस्थित होते. ते सराव करताना दिसले.

# पाकिस्तानच्या अलीम दार यांचा तडकाफडकी राजीनामा



**कराची : वृत्तसंस्था**

भारत आणि श्रीलंकेत सुरू असलेल्या टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत पाकिस्तानची कामगिरी निराशाजनक राहिली. सुपर-८ फेरीतूनच त्यांना आपला गाशा गुंडाळावा लागला असून पारंपरिक प्रतिस्पर्धी भारताकडून सपाटून मार खावा लागला. यानंतर पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाने (पीसीबी) थेट खेळाडूंवर आर्थिक दंड आकाराला आहे. यादरम्यान, पाकिस्तान निवड समिती सदस्य आणि माजी पंच अलीम दार यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

वृत्तानुसार निवड समिती सदस्य अलीम दार हे प्रशिक्षक माईक हेसन यांच्यावर नाराज असून संघ निवडीची सर्व सूत्रे त्यांच्या हातात दिल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. सूत्रांनी सांगितले की, माजी पंच असलेले अलीम दार हे टी-२० वर्ल्डकपसाठी निवडण्यात आलेल्या पाकिस्तानी संघावर नाखूष आहेत. त्यांनी या संघात बाबर आझम, शादाब खान यांना निवडण्यास विरोध केला होता, मात्र हेसन यांना हे दोन खेळाडू संघात हवे होते.

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार सूत्रांनी दावा केला आहे की अलीम दार यांचा राजीनामा पीसीबीने अद्याप स्वीकारलेला नाही.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com